# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक २८.०२.२००७ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.**

बुधवार दिनांक २८ फेब्रुवारी २००७ रोजी मा.महापौर डॉ.भागवत किसनराव कराड यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील ''प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह ''येथे दुपारी १२.३० वाजता ''वंदेमातरम्''या गिताने सुरू झाली. सभेला मा.आयुक्त तसेच संबधीत अधिकारी व खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

०१. स.स.सौ.लता श्रीनिवास दलाल
०२. स.स.श्री.रेणुकादास वैद्य
०३. स.स.श्री.संतोष खेंडके पाटील
०४. स.स.श्री.अ.साजेद अ.सत्तार
०५. स.स.श्री.बम्हणे पुनमचंद सोनाजी
०६. स.स.श्री.सुरे सिताराम इसराम
०७. स.स.श्री.ताठे भाऊसाहेब पुंडलिक
०८. स.स.श्री.गवळी रविकांत काशिनाथ
०९. स.स.श्री.नाहदी नासेर महमंद याहीया
१०. स.स.श्री.पांडे विनायक प्रभाकर
११. स.स.श्री.दाभाडे मिलींद यशवंत
१२. स.स.श्री.धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग
१३. स.स.श्री.ठाकुर पुरूषोत्तम रघुविरसिंग
१४. स.स.श्री.खान सलीम खान यासीन
१५. स.स.श्रीमती आशन्ना लक्ष्मी शंकर
१६. स.स.श्री.जगताप संजय उत्तमराव
१७. स.स.सौ.मसरद बेगम शरफोद्दीन
१८. स.स.श्री.गायकवाड दिलीप नारायण
१९. स.स.श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
२०. स.स.सौ.जोशी रजनी रमेश
२१. स.स.श्री.महेश शिवाजीराव माळवतकर
२२. स.स.श्री.जैस्वाल अनिल जुगललाल
२३. स.स.श्री.सोनवणे कचरू श्रीपती
२४. स.स.सौ.इंगळे शंकुतला सांडुजी
२५. स.स.सौ.रगडे सुशिला भगवान
२६. स.स.श्रीमती शिंदे मिराबाई रामराव
२७. स.स.सौ.पाटील दिपाली सुनिल

२८. स.स.सौ.बेंद्रे विमल तुकाराम
२९. स.स.श्री.कोकाटे काशिनाथ हरीभाऊ
३०. स.स.सौ.खान अजरा जबीन मसुद
३१. स.स.सौ.खान मेहेरून्नीसा खान हमीद
३२. स.स.श्री.मो.जावेद मो.इसाक
३३. स.स.सौ.मिटकर शोभा हरीश्चंद्र
३४. स.स.सौ.यास्मिन बेगम अ.कदिर
३५. स.स.श्री.खान जावेद हसन कासीम हसन
३६. स.स.श्री.तनवाणी किशनचंद लेखराज
३७. स.स.श्री.स.खुसरो बुऱ्हानोद्दीन
३८. स.स.श्री.अ.रशिद खान मामु
३९. स.स.श्री.पाटील नरवडे वसंत पांडुरंग
४०. स.स.श्री.रिडलॉन संजु सुग्रीव
४१. स.स.सौ.सिध्द वीणा गजेंद्र
४२. स.स.श्री.खान कैसर बद्रोद्दीन
४३. स.स.सौ.कुरैशी नजमा बेगम युनूस
४४. स.स.श्री.खान मुजीब मीर आलम खान
४५. स.स.श्री.खान निसार मो.खान
४६. स.स.श्री.शेख इब्राहीम शेख इमाम
४७. स.स.श्री.हाजी शेरखान अ.रहेमान
४८. स.स.श्रीमती मुमताज बेगम वाहेद खान
४९. स.स.श्री.पाथ्रीकर दत्ताभाऊ अण्णासाहेब
५०. स.स.श्री.बैनाडे कंवरसिंग किसनसिंग
५१. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष
५२. स.स.श्री.अमोदी अबुबकर बिन सईद
५३. स.स.सौ.शेख शमशाद बेगम शेख हफीज
५४. स.स.श्री.मोतीवाला अशरफ म.युनुस
५५. स.स.सौ.पोळ सरला सखाराम
५६. स.स.श्री.कटकटे सतीष विश्वनाथ
५७. स.स.सौ.खान जहुरबी नासेर
५८. स.स.सौ.बोरामणीकर कला सुरेश
५९. स.स.सौ.मंगला प्रकाश गायकवाड
६०. स.स.श्री.सावंत मधुकर दामोधर
६१. स.स.सौ.रेखा कैलास काथार
६२. स.स.सौ.पाटणी हर्षमाला विजयकुमार
६३. स.स.श्रीमती डॉ.बिनवडे आशा उत्तम
६४. स.स.श्री.खुडे विजय किसन

६५. स.स.श्रीमती किवळेकर जयश्री सारंग
६६. स.स.श्री.शिंदे दामोधर माधवराव
६७. स.स.श्री.गांगवे बन्सीलाल तुळशीराम
६८. स.स.सौ.ससाणे सरीता अशोक
६९. स.स.श्री.भगवान देविदासराव घडमोडे
७०. स.स.श्री.वाघ भाऊसाहेब बाबुराव
७१. स.स.श्री.डांगे बाबासाहेब लक्ष्मण
७२. स.स.सौ.शिंदे पुष्पा बाळु
७३. स.स.सौ.वाघमारे पार्वताबाई विजय
७४. स.स.सौ.संगिता विठ्ठलराव जाधव
७५. स.स.श्री.विसपुते शंशाक दामोधर
७६. स.स.श्री.निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
७७. स.स.सौ.खंदारे वंदना प्रकाश
७८. स.स.सौ.कोंडेकर अंजली दिलीप
७९. स.स.सौ.विजया किशोर रहाटकर
८०. स.स.श्री.दाभाडे हिम्मतराव साळुबा
८१. स.स.श्री.ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग
८२. स.स.श्री.मोरे कचरू विश्वनाथ
८३. स.स.श्री.संजय पांडुरंग शिरसाट
८४. स.स.श्री.बारवाल गजानन
८५. स.स.सौ.मोमीन सफीया फिरदोस
८६. स.स.सौ.घोडेले अनिता नंदकुमार

**नामनिर्देशित पालिका सदस्य**

०१. स.स.श्री.तुलशीबागवाले किशोर बाबुलाल
०२. स.स.श्री.राजेश व्यास
०३. स.स.श्री.सुरजितसिंग सबरवाल
०४. स.स.श्री.कुलकर्णी सुरेंद्र माणिकराव

**चर्चा :**

श्री.रशिद खान(मामू) : पुंडलिकनगर भागात पाणी पुरवठा करण्यासाठी गत सर्वसाधारण सभेत चर्चा झाल्याप्रमाणे दोन्ही स.सदस्य आत्महत्या करणार होते. आज पुंडलिकनगर भागास प्रशासनाने पाणी पुरवठा केलेला आहे. याबाबत आपले आणि प्रशासनाचे अभिनंदन आपणास विनंती आहे की,यामुळे शहरातील इतर विभागाचे पाणी कमी होवू नये व या भागाचा पाणी पुरवठा परत बंद होवू नये. आमच्या दोन स.सदस्यांनी जनतेच्या प्रश्नासाठी आत्महत्येची तयारी दर्शविली होती. इतर भागातील पाण्याच्या समस्या सोडविण्यात याव्यात. ड्रेनेज व इतर समस्यांचा इश्यू बनवण्यात येवू नये.

श्री.बन्सीलाल गांगवे : सिडको-हडको भागास सध्या१५-२०एमएलडी पाणी येते.यामुळे सिडको-हडको, मुकूंदवाडी, एन-२ भागाचा पाणी पुरवठा कमी होवू नये.

सौ.सुशिला रगडे : सिडको-हडको भागास काही ठिकाणी १५-२० मिनीटे काही ठिकाणी एक तास तर काही ठिकाणी दररोज पाणी सोडले जाते तर काही ठिकाणी एक दिवसाआड पाणी सोडण्यात येते असे का? सर्व भागांना समान प्रमाणात पाणी सोडण्यात यावे.

सौ.संगिता जाधव : पुंडलिकनगर भागास पाणी पुरवठा न झाल्यास मी आत्महत्या करेल अशी घोषणा सभागृहात करण्यात आली होती. आत्महत्यापूर्वी पाणी सोडले. आज मा.महापौरांच्या हस्ते उद्घाटन होवून पाणी पुरवठा करण्यास सुरूवात झालेली आहे. त्याबद्दल मा.महापौर तसेच मा.सभागृहाचे व प्रशासनाचे अभिनंदन.

श्री.संजय शिरसाट : पुंडलिकनगरच्या पाण्याचा प्रश्न यापूर्वी अनेकवेळा या सभागृहात मांडण्यात आलेला आहे. या भागातील पाण्यासाठी स.सभागृह नेते टाकीवरून उडी टाकून आत्महत्या करणार होते. तर त्या वॉर्डाचे नगरसेविका विष घेणार होते. परंतू आज हा प्रश्न सोडवण्यात आला. प्रशासनाने हो म्हटल्याशिवाय त्या ठिकाणी पाणी सोडले गेले नाही अशा वृत्तपत्रात बातम्या आलेल्या आहेत. महापौरांच्या घोषणेस मान दिल्याबाबत प्रशासनाचे आभार मानावे लागतील. कारण त्यांच्या मनात आल्याशिवाय काहीच होत नाही. मी यापूर्वीही काही बैठकांमधून बोललो आहे की, पाणी देणे ही आपली नैतीक जवाबदारी आहे. परंतू देशमुखनगर,रामकृष्णनगर, दुर्गानगर, नाथनगर या भागातील लोकांनी १००% बेटरमेंट चार्जेस भरलेले आहेत. त्या वसाहतीतील लोकांना पाणी का देण्यात येत नाही. अनधिकृत वसाहतीतील लोकांना पैसे भरल्यानंतर आम्ही ताबडतोब पाणी देतो मग या लिगल वसाहतीतील नागरिकांना आपण केव्हा पाणी देणार. या लोकांची चूक काय आहे. यांना पाणी न देण्यामागील नेमके काय कारण आहे. हा विषय सेंसेटीव्ह आहे.

मा.महापौर : शहरात अशा काही वसाहतील आहेत ज्यांनी महानगरपालिकेचे बेंटरमेंट चार्जेस वगैरे पूर्णपणे भरलेले आहेत. परंतू त्यांना पाणी पुरवठा केला जात नाही. याबाबत मा.आयुक्त खुलासा करतील.

मा.आयुक्त : अनधिकृत वसाहतीतील जे नागरिक गुंठेवारीमध्ये पैसे भरतील त्या भागास पाणी पुरवठा करण्यात येईल असा धोरणात्मक निर्णय घेण्यात आलेला होता. पुंडलिकनगर भागातील नागरिकांनी गुंठेवारी अंतर्गत पैसे भरलेले आहेत. जवळपास १७५ लोकांनी पैसे भरलेले आहेत. त्यामुळे या भागास पाणी सोडण्याचा निर्णय घेण्यात आला. गुंठेवारी रेग्युलरराईज केल्याशिवाय पाणी मिळणार नाही ही आमची भूमिका होती ती तशीच आहे. पुंडलिकनगर भागात ज्यांच्याकडे नळ कनेक्शन्स आहेत त्यांनी ५ तारखेपर्यन्त पाणीपट्टी व गुंठेवारीचा हप्ता भरला नाही तर त्यांचे कनेक्शन्स कट करण्यात येतील. सिडको-हडकोतील पाणी पुरवठयास डिस्टर्ब न करता एक-दोन एमएलडी पाणी आम्ही देवू शकतो. जे नागरिक गुंठेवारीत घरे नियमित करून घेणार नाहीत व नळ कनेक्शन रेग्युलर करून घेणार नाहीत. त्यांना पाणी देण्यात येणार नाही. उद्यापासून सर्वांना तशा नोटीसेस पण देण्यात येणार आहेत. माजी सभागृह नेत्यांनी मांडलेल्या प्रश्नाशी मी सहमत आहे. ज्या लिगल सोसायटयांनी सर्व प्रकारे कर भरलेले आहेत अशा काही सोसायटयांना आपण पाणी देवू शकत नाही त्यामागे दोन प्रकारच्या अडचणी आहेत. काही सोसायटंयाची

फिजीकल अडचण अशी आहे की, त्यांना चांगल्याप्रकारे पाणी देता येत नाही. दुसरी अडचण म्हणजे सध्या पाण्याची उपलब्धता नाही. आपण १० एमएलडी पाणी वाढवलेले आहे. त्यातील ५०% पाणी गुंठेवारी भागास देण्यात येणार आहे व ५०% पाणी ज्या जुन्या व लिगल सोसायटया आहेत त्यांना देण्यात येईल. ज्या लिगल सोसायटीज व त्यांना पाणी देण्यासंदर्भात अभ्यास करण्याबाबत अधिकाऱ्यांना सूचना दिल्या आहेत. नाथ प्रांगण व इतर सोसायटयांमध्ये पाण्याची उपलब्धता व फिजीकल लोकेशन पाहून पाणी देण्यात येईल. शहरात जे काही १०-२० एमएलडी पाणी वाढीव पाणी येणार आहे त्यातील ५०% पाणी गुंठेवारीसाठी आणि ५०% पाणी जुन्या लिगल सोसायटयांसाठी ठेवण्यात येईल. प्रत्येक सोसाटीचा अभ्यास करून ज्या सोसायटयांना पाणी देणे शक्य असेल त्यांना देण्यात येईल.

श्री संजय शिरसाठ : अशा भागातील बिल्डर्सनी डेव्हलप केलेल्या काही सोसायटयांना दोन इंची कनेक्शन दिलेले आहे. बिल्डर्सना कनेक्शन देतांना फिजीकल लोकेशनची अडचण येत नाही काय ? त्या सोसायटयांना आपण नेमके पाणी केव्हा देणार आहात.

मा.आयुक्त : या सोसायटयांचा सर्व्हे व अभ्यास होत नाही तो पर्यन्त या सोसायटयांना केव्हा पाणी मिळेल हे सांगता येणार नाही.

श्री संजय शिरसाठ : जेव्हा या सोसायटयांचा ले आऊठ मंजूर झाला तेव्हा हे पाहण्याची आवश्यकता वाटली नाही काय ?

श्री.शंशाक विसपुते : अशा अनेक सोसायटयांना पाणी देण्यात येत नाही. जय दुर्गा सोसायटी खाली आहे. तेथे जलवाहीनी टाकलेली नाही.

श्री संजय शिरसाठ : लेआऊट मंजूर करतांना आपण सर्व प्रकारचे चार्जेस घेतो. चार्जेस घेतल्यानंतरही त्यांना पाणी देण्यात येत नाही असे का. काही ठिकाणी टाकलेली पाईप लाईन प्रशासनास शोधूनही सापडत नाही.

मा.आयुक्त : काही ठिकाणी पाईप लाईन टाकलेली आहे परंतू पुरेसे पाणी नसल्याने ती चार्ज करण्यात आलेली नाही. परंतू ज्या लिगल सोसायटया आहेत त्यांचा सर्व्हे करून घेवून जेथे जेथे शक्य आहे त्या ठिकाणी पाणी देण्यात येईल.

श्री संजय शिरसाठ : मागील ४ वर्षापासून या प्रश्नावर मी या सभागृहात भांडत आहे. लिगल सोसायटीजकडून तुम्ही सर्व प्रकारचे पैसे भरून घेतलेले आहेत. ज्या सोसायटयांकडून तुम्ही सर्व प्रकारचे चार्जेस भरून घेतलेले आहेत त्यांना मात्र १५-२० वर्षापासून पाणी देण्यात येत नाही यात त्या नागरिकांची चूक कोणती. आपण सर्व्हे केव्हा करणार आहोत. या सोसायटयांमध्ये महानगरालिकेचा टँकरही जात नाही. दुसरीकडून त्यांना टँकरने पाणी मागवावे लागते.

श्री.रेणुकादास वैद्य : आताच मा.आयुक्तांनी सांगितले की, शहरात पाणी नाही. परंतू वस्तुस्थिती अशी नाही. शहराला जेवढे लिगल कनेक्शन लागते, तेवढे पाणी शहरात नक्कीच येते. दुदैवाने आपणाकडे पाण्याचे नियोजन व्यवस्थित होत नाही काही वॉर्डात २४ ताास पाणी वाहते तर काही वॉर्डात तीस मिनीटाच्यावर पाणी येत नाही. पाण्याचे नियोजन व्यवस्थित केले तर शहरात आपण पुरेसे पाणी देवू शकतो असे मला वाटते.

श्री पुनमचंद बमने : मागील दोन दिवसांपासून माझ्या वॉर्डात पाणी नाही. लोक पैसे भरोत न भरोत माझ्या वॉर्डात पाणी पाहिजे. लोक पैसे भरण्यास तयार आहेत. आताच पाणी सोडण्यात यावे.

श्री प्रशांत देसरडा : स.न.से.यांनी प्रश्न उपस्थित केला आहे की, मागील दोन दिवसांपासून त्यांच्या वॉर्डास पाणी देण्यात येत नाही. हा गंभीर प्रश्न आहे. एखाद्या वॉर्डाचे पाणी दोन-दोन दिवस बंद केले जाते. याबाबत प्रशासनाने पदाधिकाऱ्यांना काही कल्पना दिली आहे काय. शहरात असे किती भाग आहेत त्यात गुंठेवारी अंतर्गत लोकांनी पैसे भरलेले नाहीत.

मा.महापौर : याबाबत मा.आयुक्त खुलासा करतील.

मा.आयुक्त : हर्सूल भागातील पाणी बंद करण्यात आलेले होते. त्याबाबत वृत्तपत्रातच निवेदन देण्यात आलेले आहे. त्या भागात ३५० च्या आसपास कनेक्शन्स आहेत व केवळ १० लोक पैसे भरत आहेत. बाकी लोक पैसे भरत नाहीत. किमान २५% लोकांनी पैसे भरले तरी पाणी सोडण्यात येईल असे मी सांगितलेले आहे.

श्री काशिनाथ कोकाटे : स.स. पुनमचंद बमने यांनी त्यांच्या वॉर्डातील पाणी अचानकपणे बंद करण्यात आल्याबाबतचा प्रश्न सभागृहात उपस्थित केलेला आहे. मा.आयुक्तानी आताच खुलासा केला की, त्या भागात ३५० कनेक्शन्स आहेत व १० लोकच पैसे भरत आहेत. म्हणून प्रशासनाने या भागाचा पाणी पुरवठा तोडलेला आहे. ज्या नगरसेवकाच्या वॉर्डातील पाणी अचानकपणे बंद करण्यात आलेले आहे. त्या स.नगर सेवकास याबाबत आपण कल्पना दिलेली आहे काय. १० लोकांनी पैसे भरलेले आहेत व इतरांनी भरलेले नाहीत याची कल्पना त्या भागाचे नगरसेवक अथवा महापौर यांना दिलेली आहे काय. अशी कल्पना देणे प्रशासनास गरजेचे वाटत नाही काय.

श्री किशनचंद तनवाणी : प्रथमत: हर्सूल भागास पाणी देण्यात यावे तो पर्यन्त ही सभा तहकुब करण्यात यावी.

मा.महापौर : ज्या सोसायटयांनी बेटरमेंट चार्जेस भरलेले आहेत, पाईप लाईन टाकलेली आहे, कनेक्शन दिलेले आहेत परंतू त्या सोसायटयांना पाणी मिळत नाही त्यांची एकत्रीत यादी तयार करावी व अशा सोसायटयांना १० तारखेच्या आत दोन एमएलडी पर्यन्त पाणी दिले जाईल. पूर्ण हर्सूल गांवात पाणी पुरवठा बंद केलेला आहे. त्या ठिकाणी केवळ दहा लोकांनी पाणीपट्‌टी भरलेली आहे. बाकीच्यांनी पाणीपट्‌टी भरलेली नाही. पाणीपट्‌टीचा भरणा करण्यासाठी त्यांना पाच दिवसाचा वेळ देण्यात आलेला आहे. पाच तारखेपर्यन्त त्यांनी पाणीपट्‌टी भरली नाही तर त्यांचे नळ कनेक्शन्स तोडण्यात यावेत. पाणी बंद करू शकत नाहीत हे खरे आहे.

श्री मुजीब आलम खान : आजपर्यन्त शहरात महानगरपालिकेने कोणत्याही वॉर्डाचे पाणी बंद केलेले नव्हते. हा लोकांच्या जिवनाशी खेळ आहे. जायकवाडीच्या मुख्य लाईनवरून लोकांनी फॅक्ट्रीजसाठी २ इंच - ३ इंच व्यासाचे कनेक्शन्स घेतलेले आहेत. महापालिका खात्यात त्यांचे नांव नाही. आठ महिन्यापूर्वी मी हा प्रश्न सभागृहासमोर उपस्थित केलेला होता. चिकलठाण्यापर्यन्त अनेक हॉटेल्सवाल्यांनी अनधिकृत नळ

कनेक्शन्स घेतलेले आहेत. परंतू त्यांची चौकशी होत नाही. त्यांच्याकडून वसूलीही होत नाही. मात्र गरीबांचे पाणी तोडण्यात येते.

यावेळी विरोधी पक्षाचे स.नगरसेवक सभात्याग करतात.

श्री.पुनमचंद बमणे : माझ्या वॉर्डास पाणी केव्हा देण्यात येणार आहे.

मा.महापौर : हर्सूलला आजच्या आज पाणी देण्यात यावे.

श्री काशिनाथ कोकाटे : अधिकाऱ्यांना बोलावून वॉल उघडण्यास व पाणी पुरवठा सुरू करण्यास सांगा. तोपर्यन्त सभा तहकुब करावी. पाणी बंद करण्यापूर्वी त्या भागातील स.नगरसेवकास सांगावयास हवे होते. गावात तशी अनाऊन्सिंग करावयास हवी होती ती का केली नाही.

श्री.संतोष खेंडके : स.स.श्री.पुनमचंद बमणे यांनी जो प्रस्ताव मांडला आहे त्यानुसार त्यांच्या वॉर्डाचा पाणी पुरवठा तात्काळ सुरू करण्यात यावा. पुंडलिकनगरला पाणी दिल्याबाबत मी सर्वांचे अभिनंदन करतो. यामुळे सेना-भाजप युतिची एक वचनपूर्ती झालेली आहे.

श्री किशनचंद तनवाणी: प्रथमत: हर्सूल भागास पाणी देण्यात यावे त्यानंतरच सभा सुरू करण्यात यावी.

मा.महापौर : हर्सूलचा पाणी पुरपवठा ताबडतोब सुरू करण्यात यावा. एक महिन्यात नागरिकांनी पाणीपट्टी भरली पाहिजे. स.स.श्री.पुनमचंद बमणे,श्री.काशिनाथ कोकाटे,कार्यकारी अभियंता श्री एस.डी.पानझडे यांनी जाऊन पाणी पुरवठा सुरू करावा.

मा.आयुक्त : दहा वर्षापासून नोटीसा देण्यात येत आहेत परंतू कोणीही बील भरत नाही. या वर्षीही तीन नोटीसा दिलेल्या आहेत. तरीही नागरिकांनी बिल भरलेले नाही.

दुपारी २.३० वाजता तहकुब केलेली सभा ३.१० वाजता परत सुरू झाली.

श्री.किशनचंद तनवाणी : अगोदर पाणी देण्यांत यावे, नंतर वसुली करावी.

मा.महापौर : हर्सूलचा पाणी पुरवठा तात्काळ सुरू करण्यात यावा. तेथील नागरिकांनी ३० मार्चच्या आंत पाणीपट्टी थकबाकी भरणे गरजेचे आहे. तसेच ज्यांच्याकडे अनधिकृत नळ कनेक्शन्स आहेत त्यांनी ३२५०/- रूपये भरून नळ कनेक्शन अभय योजने अंतर्गत रेग्युलराईज करून घ्यावेत. तसेच ज्यांना नविन कनेक्शन घ्यावयाचे असतील त्यांनी नविन कनेक्शन चार्जेस अधिक रू.१८००/- अधिक रू.१५०/- या महिण्याचे चार्जेस भरावेत.

श्री मुजीब आलमशाह खान: चिकलठाणा ते बाबा पेट्रोलपंप पर्यन्त अनेक ठिकाणी २ इंची ते ३ इंची नळ कनेक्शन्स हॉटेल्स्,इंडस्ट्रीजवाल्यांनी घेतलेले आहेत. परंतू रेकॉर्डवर त्यांचा कोठेही उल्लेख नाही. मी याचा मागील ८-१० महिण्यापासून पाठपुरावा करत आहे. परंतू याचा आजपर्यन्त सर्व्हे झालेला नाही. परंतू अनधिकृतरित्या अशा नळांची वसूली होत आहे. अधिकारी याकडे का लक्ष देत नाहीत. श्रीमंतांना फुकटात पाणी, मात्र गरिबांचे पाणी बंद करण्यात येत आहे. पाण्याचा पैसा भरावयास हवा. काही ठिकाणी सहा इंची लाईन अनधिकृतरित्या घेतलेल्या आहेत याची चौकशी व्हावयास हवी.

मा.आयुक्त : बाबा पेट्रोलपंप ते चिकलठाणा या रोडवरील नळ कनेक्शन्स शोधण्यासाठी एक स्पेशल टीम तयार करण्यात येईल.शहरात बरेच कमर्शियल कनेक्शन्स आहेत. परंतू ते रेकॉर्डवर नाहीत. याबाबतच्या सर्व्हेचा एक प्रस्ताव सभेसमोर मांडण्यात आला

होता. परंतू तो स्थगित ठेवण्यात आलेला होता. कमर्शियल कनेक्शन्सची वसूली एकादा प्रायव्हेट एजन्सीकडून करून घेवून असे अनधिकृत कनेक्शन्स रेकॉर्डवर आणता येतील.

श्री मुजीब आलमशाह खान: प्रायव्हेट एजन्सीजचा भरोसा नाही. यासाठी आमचे अधिकारी सक्षम आहेत. त्यांनी मनात आणले तर आठ दिवसात हे काम पूर्ण होईल. मागील १५-२० वर्षापासून हे लोक अनधिकृतपणे पाणी घेत आहेत.

मा.आयुक्त : कमर्शियल नळ कनेक्शनपासूनची आपली वसूल जवळपासएक कोटीची आहे. संपूर्ण शहराचा सर्व्हे झाल्यानंतर ती जवळपास ३-४ कोटी होईल असा अंदाज आहे. यासाठी संपूर्ण शहराचा सर्व्हे होणे आवश्यक आहे. त्यामुळे सर्व कनेक्शन्स रेकॉर्डवर येतील व त्यांची नियमित वसूली होईल.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : हर्सूलचे पाणी सुरू झाले परंतू स.स.श्री.मुजीब आलमशाह खान यांनी सांगितलेली अनाधिकृत कनेक्शन्स तसेच विरोधी पक्ष नेता ंयानी अशाच प्रकाराची एक यादी दिली होती त्यावर कारवाई का होत नाही. अशा प्रकारची अनधिकृत जोडण्या रोखल्या तर अशा प्रकारे पाणी वगैरे रोखण्याची आवश्यकता भासणार नाही. आपले अधिकारी कर्मचारीच अशा कामांना प्रोत्साहन देतात. त्यामुळे नागरिकांना वाटते काही पैसे भरले तरी चालतात. महानगरपालिकेचा रेव्हेन्यु कसा वाढेल याप्रकारे महानगरालिकेच्या अधिकाऱ्यांनी काम करावे. रेव्हेन्यु वाढला तर विकासाची कामे चालतील. पाण्याचा अथवा विकासाचा प्रश्न हा कुठल्याही राजकीय पक्षाचा प्रश्न नाही. कोणत्याही कार्यक्रमांस पक्षीय स्वरूप येवू देवू नका. कोणत्याही नगरसेवकास पाण्यासाठी आपल्यशा इथपर्यन्त येण्याची गरज प्रशासनाने पडू देवू नये. मी माझ्या वॉर्डात नोटीसी लावल्या ज्यांनी पैसे भरले नसतील त्यांनी ते भरावेत म्हणून.

सौ.विजया रहाटकर : पुंडलिकनगर भागाचा पाण्याचा प्रश्न खुप जुना होता. त्या भागास पाणी दिल्याबाबत आपले अभिनंदन. हे काम करत असतांनाही आपणास वसुलीकडे लक्ष देणे आवश्यक आहे. जे नागरिक वेळेवर कराचा भरणा करतात त्यांचे पाणी दुसरीकडे जात आहे असे होवू नये याची प्रशासनाने दक्षता घ्यावी. ज्या लिगल सोसायटया आहेत त्यांना आपण पाणी देवू शकत नाही. माझ्या वॉर्डात प्रशांतनगर हा लेआऊट १५ वर्षे जुना आहे परंतू त्या भागास अद्यापही पाणी दिलेले नाही. त्या भागास पाणी देण्यात यावे. शहरात पाण्याचे समप्रमाणात वितरण व्हावयास हवे. परंतू ते होत नाही. शहरात एकूण किती एमएलडी पाणी येते, प्रत्येक भागात किती पाणी देण्यात येते. एक दिवसाआड पाणी कोणत्या भागात देण्यात येते ,कोणत्या भागास दररोज पाणी दिले जाते याची माहिती मागुनही प्रशासनाकडून मिळत नाही. पैसे भरणाऱ्यांना पुरेशा प्रमाणात पाणी दिले जात नाही. मागील एकाच महिन्यात चार वेळा पाणी बंद करण्यात आले.

श्रीमती किवळेकर : साऱ्या शहराच लक्ष वेधुन घेणारा हा पुंडलिकनगरचा पाण्याचा प्रश्न आज आपण सोडवलेला आहे. याबाबत आपल्या सर्वांचे अभिनंदन तसेच हर्सुलचा पाणीपुरवठा तीन दिवसापासुन बंद झाल्या बाबतचा प्रश्न श्री.पुनम बमने यांनी उपस्थित केला

होता. तोही आपण निकाली काढलेला आहे. परंतु असे असताना १००% पाणीपट्टी भरणाऱ्या भागातील पाणी इतरत्र वळविले जात आहे. माझ्या वार्डातुन १००% पाणीपट्टी वसुल होते. मात्र एकदिवसाआड तेही ४५ मिनिटे पाणी पुरवठा केला जातो. सर्व शहरासह एक दिवसाआड पाणी देण्यात यावे. श्री. प्रशांत देसरडा यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरेही या सभागृहात अपेक्षीत आहेत आपल्याकडे पाण्याच्या नियोजनाचा मोठा अभाव आहे. शहराच्या नेमक्या कोणत्या भागात एक दिवसाआड व कोणत्या भागात दररोज पाणी दिले जाते. याची माहिती सर्व सदस्यांना देण्यात यावी. ज्या भागातुन पुर्ण वसुली होते त्याच भागावर आपण अन्याय करत आहोत. हे चूक आहे.

मा.महापौर : स.स.श्री.प्रशांत देसरडा यांच्या प्रश्नावर प्रशासनातर्फे उत्तर देण्यात आलेले नाही. मी कार्यकारी अभियंता पा.पू. यांच्याशी चर्चा केली मागील आठवड्यात मुख्य जलवाहिनी दोनदा फुटल्याने ते त्या कामात व्यस्त होते. या बाबत आयुक्तांशी माझी चर्चा झालेली आहे. प्रशासनातर्फे सात दिवसात स.नगरसेवक श्री.प्रशांत देसरडा यांच्या प्रश्नास उत्तर देण्यात येईल. असे मा.आयुक्तांनी सांगितले आहे त्यानुसार प्रशासनाने सात दिवसात प्रश्नाचे उत्तर द्यावे.

श्री.माळवतकर : पुंडलिकनगर ला पाणी दिल्यानंतर सिडको-हडको भागाचा पाणीपुरवठा कमी होईल का याबाबत संबंधित कार्य.अभियंता यांचेकडे विचारणा केली होती. त्यावेळी त्यांनी लेखी उत्तर दिले होते की, पुंडलिक नगरला पाणी पुरवठा केल्यानंतर सिडको-हडकोचा पाणी पुरवठा निश्चितच कमी होणार आहे. आज आपण पुंडलिकनगरला पाणी दिलेले आहे. त्या जनतेसही पाणी देणे आवश्यक आहे. परंतु यामुळे सिडको हडको जे २०-२२ वार्ड नियमीतपणे पाणीपट्टी भरतात त्यांच्या पाणी पुरवठ्यावर परिणाम होऊ नये. पाणी वितरणा बाबतचे आपले नियोजन बरोबर नाही. प्रत्येक वार्डास देण्यात येणाऱ्या पाण्याची माहिती या सभागृहास देण्यात यावी. जर अधिकृत कनेक्शन वाल्यांकडून आपण १८००/- रू. पाणीपट्टी घेतो. तर सर्वांना समान पाणी देणे ही आपली जबाबदारी आहे. शहरात जवळपास २० हजार अनधिकृत नळ कनेक्शन आहेत असे प्रशासन सांगते. मात्र थोड्याशा लोकांसाठी हर्सुलचा पाणी पुरवठा तोडला जातो. अनधिकृत नळ कनेक्शन तोडण्याची आपण कार्यवाही का करत नाहीत. ज्यांनी अनधिकृत नळ कनेक्शन घेतले आहेत अशा धनधाडग्यांचे अनधिकृत नळ कनेक्शन आधि तोडण्यात यावेत. ज्यांनी बेटरमेंट व इतर सर्व चार्जेस भरले आहेत त्यांना आपण पाणी देणार नाही का. जेवढे पाणी शहरात येते त्याचे नियोजन करा व सर्वांना समान पाणी द्या.

श्री.सिताराम सुरे : माझ्या वार्डातील १०० टक्के लोकांनी टॅक्स भरलेला आहे. अशा १५ सोसायट्यांपैकी केवळ ३ सोसायट्यांना पाणी मिळते व तेही अर्धा तासच टाकीतुन प्रेशरने पाणी का येत नाही मयुरपार्कसह इतर १० सोसायट्यांना पाणी देण्यात यावे.

श्री.दामुआण्णा शिंदे : क्रांतीचौक पासुन सिडको -हडकोसाठी पाईपलाईन टाकलेली आहे. जालना रोडवरून जाणाऱ्या या लाईनवरून बऱ्याचशा हॉटेल वाल्यांनी एक ते दीड इंची कनेक्शन घेतलेले आहे. हे पाणी ९-१२ तास चालु असते. यापुर्वीही हा प्रश्न मी

विचारलेला आहे परंतु त्यावर कार्यवाही झालेली नाही. केवळ १८००/- रू.भरून हे लोक १२ तास पाणी घेत आहेत. त्यांच्यावर कार्यवाही झाली पाहिजे.

सौ. रजनी जोशी : पुंडलिक नगर भागास आज आपण पाणी पुरवठा सुरू केला याबाबत आपणा सर्वांचे अभिनंदन मात्र याभागास सिडकोच्या एक्सप्रेस लाईनमधुन पाणी देण्यात आलेले आहे. काय? याचा खुलासा व्हावा. सिडको -हडको भागाची वसुली पुर्णपणे होते ज्या सोसायट्यांनी बेटरमेंट चार्जेस भरलेल आहेत त्या सोसायट्यांना पाणी देण्यात यावे. जाधववाडीत मेन लाईन वरून कनेक्शन घेण्यात आलेले आहे. ते तोडण्यात यावे. पाण्याचे नियोजन व्यवस्थित करण्यात यावे.

श्री.सलीम खान : आपण पुंडलिकनगरला पाणी दिले ही चांगली गोष्ट आहे. स.न.सेविका सौ.संगिता जाधव व सभागृह नेता यांचा हा पाण्याचा प्रश्न सोडवला त्याबाबत अभिनंदन मात्र केवळ काही लोकांनी पाणीपट्टी भरली नाही म्हणून हर्सुलचे पाणी तोडण्यात आले हे बरोबर नाही. ज्यांना पाणी नाही त्यांना आपण टँकरने पाणी देतो. अनधिकृत नळ कनेक्शन धारकां विरोधी मोहीम घेण्यात यावी. त्यांच्याकडून वसुली करण्यात यावी.

श्री.सय्यद खुसरो : शहरात बऱ्याच भागात मोठमोठे अपार्टमेंट बांधण्यात आलेले आहेत. मागील वर्षात अशा किती अपार्टमेंटना परवानगी देण्यात आलेली आहे. किती जनांना बांधकाम करताना पाणी घेण्याची परवानगी देण्यात आली. रात्रीतुन मेन लाईन फोडून कनेक्शन घेतले जातात. त्यावर आपण काय कार्यवाही करणार आहोत.

श्रीमती मेहरून्नीसा खान : शहरात सर्व भागात समान पाणी देण्यात येत नाही. काही ठिकाणी दोन वेळा पाणी देण्यात येते तर काही ठिकाणी अर्धा तास. तर काही ठिकाणी एक दिवसाआड मात्र टॅक्स सर्वांकडून सारखाच घेतला जातो.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : दोन महिन्यापुर्वी बैठकीत मी सांगितले की, शहरात २५०००/- पेक्षा जास्त अनधिकृत नळ कनेक्शन आहेत. याबाबतही सविस्तर माहिती मी प्रशासनाकडे दिलेली आहे. या अनधिकृत नळ कनेक्शन मुळे मनपाचे ४० कोटीचे नुकसान होत आहे. पण केवळ ३५० लोकांनी पाणीपट्टी भरली नसल्यामुळे पुर्ण हर्सुल गावचा पाणी पुरवठा बंद करण्यात आला. पुंडलिक नगर भागास आज आपण पाणी पुरवठा सुरू केला या बाबत आपले अभिनंदन शहरात दररोज १४०-१४५ एमएलडी पाणी येते. शहरात येणारे पाणी फारतर प्रत्येक घरात दररोज दरडोई १५० लीटर पाणी मिळावयास पाहिजे. परंतु तसे होत नाही. आपण शहरास जे पाणी देतो त्याचे कोणतेही नियोजन नाही. शहरात अनेक मोठमोठे उद्योगधंदे आहेत. परंतु ते अनधिकृत रित्या कनेक्शन घेत नाहीत. माझ्या वार्डात २-३ दिवसाआड पाणी येते. परंतु काही भागात दररोज पाणी येते याबाबत प्रशासन काही करणार आहे का.

मा.महापौर : याबाबत प्रशासनाने खुलासा करण्यात यावा.

मा.आयुक्त : मा.विरोधी पक्षनेता यांनी शहरातील अनधिकृत नळ कनेक्शन बाबत माहिती दिलेली आहे. त्यानुसार सर्व वार्ड ऑफीसेस कडून माहिती मागविण्यात आलेली आहे. अभय योजनेत नियमित करता येईल.

श्री.पुरूषोत्तम ठाकुर : पुंडलिक नगर भागास पाणी पुरवठा सुरू केल्याबाबत आपणा सर्वांचे अभिनंदन. शहरात असे अनेक बिअर बार , हॉटेल्स ,अपार्टमेन्ट आहेत ज्यांनी अनधिकृत नळ

कनेक्शन घेतलेले आहेत. शहरातील अनधिकृत प्लॉटीग माझ्या वार्डातील खुल्या जागा याबाबतची माहिती मी मागितलेली होती तिही अद्याप मिळालेली नाही.

श्री.रशिद खान मामु : आपण ज्या टॅक्सच्या पावत्या देतो त्यावर पाण्याचा टॅक्सही दर्शविण्यात यावा. कमर्शियल घरे किती आहेत याची माहिती द्यावी व मालमत्ता कराच्या पावतीतच पाणीपट्टीची मागणी दाखविण्यात यावी. बऱ्याचशा प्रकरणांमध्ये घर एकाच्या नावावर व कर दुसऱ्याच्या नावावर अशी परिस्थिती आहे. डॉ.झकेरीया यांनी पाण्याची लाईन २५ वर्षात ६ लाख लोकसंख्या होईल या गृहीताने आणली होती या लाईनचे आयुष्य २५ वर्षाचे होते प्रत्यक्षात ३५ वर्ष झाली आहेत. लोकसंख्या वाढलेली आहे. आज ती १६ लाख आहे. ६ लाख लोकांसाठी बनवलेल्या लाईन मधुन १६ लाख लोकांना पाणी कसे देणार झोपडपट्टया, गुंठेवारीत वाढ झालेली आहे पाणी देणार कोठून.

मा.महापौर : मोठी पाण्याची पाईप लाईन टाकण्याचा प्रस्ताव आहे. यासाठी केंद्र शासन व महाराष्ट्र शासन यांच्याकडे आपण दोन वेळेस जाऊन आलेले आहोत. शासनाकडे प्रस्ताव सादर केलेला आहे. २०२५ वर्षा होणारी लोकसंख्या गृहीत धरून नियोजन करण्यात येत आहे.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : शहरात आलेले पाणी त्यावर होणारी चोरी रोखण्यात यावी. सर्व शहरासाठी समान पाणी वाटण्यात यावे. पाण्याचे नियोजन करण्यात यावे. सखल भागास जास्त पाणी जाते अशा ठिकाणी वॉल्व टाकण्यात यावे. प्रत्ये क टाकीचा सर्वे करण्यात यावा.

श्री.वसंत नरवडे पाटील : शहराच्या पाणीपुरवठ्यासाठी असलेली पाईपलाईन सतत फुटत आहे. पुढे उन्हाळ्याचे दिवस आलेले आहेत. उन्हाळ्यात पाण्याची गरज वाढणार आहे. अंगुरी बात ते जिल्हा परिषद पर्यंत १५ दिवसात लाईन फुटली त्यामुळे पाणी पुरवठा होत नाही. अधिकारी फोनवर सापडत नाहीत. यापडली तर धातुर मातूर उत्तरे देतात. पाण्याचे नियोजन होणे गरजेचे आहे. यासाठी एनव्हायर्नमेंट डीपार्टमेंट कडील अधिकारी/कर्मचारी डेप्युटेशनवर घ्यावीत ही माझी सुचना होती. परंतु त्यावर काहीही झालेले नाही. आपले कडचे अधिकारी नविन आहेत त्यांना लाईनची पुर्णपणे माहिती नाही.

श्री.प्रशांत देसरडा : मी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देण्यात आलेली नाहीत. मी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे दिली तर शहरातील पाण्याचा प्रश्न सुटू शकतो एवढे ते गंभीर प्रश्न आहेत. आपल्याकडे पाण्याचे ऑडीट केले जात नाही शहरात येणाऱ्या पाण्याचे डिस्ट्रीब्युशन व्यवस्थित केले तर पुढे चार पाच वर्ष हेच पाणी पुरू शकते.४० टक्के पाण्याचा आपल्याकडे हिशेब नाही. मागच्या महिन्यात मा.गडकरी साहेबांनी आपल्या अधिकाऱ्यांशी पाण्याबाबत चर्चा केली. शहरासाठी समांतर जलवाहिनी टाकण्याचे प्रश्न उपस्थित झाले. परंतु स्थानिक स्वराज्य संस्थांनी त्यांचे स्त्रोत निर्माण करावेत. असे शासनाचे धोरण आहे. जायकवाडी ते एमडीआर पर्यंतचे आपण टेंडर काढले . परंतु यामुळे पाणीपट्टी रू.५०००/- होईल अशी भिती जनतेच्या मनात निर्माण झालेली आहे. त्यामुळे समांतर जलवाहिनीस नागरीकांचा विरोध आहे. मा.गडकरी

साहेबांनी सुचना केली जायकवाडी ते एमडीआर पर्यंतची टेंडर काढण्याची प्रक्रिया चूकलेली आहे. टेंडर जायकवाडी ते नागरीकांच्या सप्लाय पर्यंत टेंडर काढावयास हवे होते. व रेट फिक्स करावयास हवे होते. त्यामुळे शहरात व्यवस्थित पाणी पुरवठा होईल. ४० टक्के पाण्याचा हिशोब आपणास सापडणार नाही.

मा.आयुक्त : सात दिवस लागतील एमबीआर पर्यंत टेंडर काढण्यामागे ही कल्पना होती की कॉन्ट्रॅक्टरने महानगरपालिकेस पाणी द्यावे. कॉन्ट्रॅक्टरशी नागरीकांचा कोणताही संबंध येत नाही. ३० वर्षाचे टेंडर ठेकेदाराने घरापर्यंत पाणी पुरवठा करावे असे काढले असते तर प्रश्न निर्माण झाला असता. प्रशासनास असे वाटते की पहिल्या टप्पयात अनधिकृत कमर्शियल नळ कनेक्शन शोधण्याचे खाजगीकरण करण्यात यावे. एखाद्या टाकीवर एखाद वर्षाचे प्रायव्हटायझेशन करून पाण्याचे डिस्ट्रीब्युशन करून पाहण्यास हरकत नाही. ही बाब यशस्वी झाली तर इतर भागासाठी त्याचा विचार करता येईल.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : टेंडर काढले बीओटी चे तर मग शासनाकडे अनुदान कशासाठी मागता कोएतेही एक करा.

श्री.किशनचंद तनवाणी : टेंडर नेमके कोणते काढले आहे. समांतर जलवाहिनी करू नये असा सभागृहाने निर्णय घेतलेला आहे.

मा.महापौर : बीओटीचे टेंडर काढले आहे. मात्र शासनाचे अनुदान मिळाले तर त्यास प्रथम प्राधान्य देण्यात येईल. शासनाचे अनुदान मिळण्यासाठी प्रयत्न चालू आहेत.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : बीओटीचे एक वर्षापासुन चालू आहे. बीओटी न करणे बाबत सभागृहाने निर्णय घेतलेला आहे. नागरीकांना महाग पाणी देण्यात येणार नाही १२० एमएलडी पाण्याचे वितरण कशा प्रकारे होते याची माहिती देण्यात यावी. २०-२५ टक्के पाणी वेस्ट होते हे थांबले पाहिजे.

श्री.भाऊसाहेब ताठे : २००३ मध्ये सिडकोसाठी एक्सप्रेस लाईन सुरू केली. त्यातुन २३-२४ एमएलडी पाणी येते परंतु यातून पुंडलिक नगर भागास पाणी दिले तर सिडकोत पाणी कमी पडेल यासाठी पाणी वाढवून देण्यात यावे. २४ तास मशिनरी चालू ठेवल्यास पाण्याचे प्रेशर कमी होईल.

श्री हिम्मतराव दाभाडे : गुंठेवारी केव्हापासुन अस्तित्वात आलेली आहे. एकनाथ नगर भागास दररोज पाणी मिळत नाही. तुलसी अपार्टमेंट मधील लोकांना मागील २० वर्षापासुन पाणी मिळत नाही.

मा.महापौर : पाणी पुरवठ्याबाबत येत्या ४-५ तासापासुन चर्चा सुरू आहे. पुंडलिक नगर भागास आज पाणी देण्यात आले त्यामुळे सर्व सदस्यांनी आनंद व्यक्त केला. या भागास जवळ जवळ ३ एमएलडी पर्यंत पाणी देता येऊ शकते. येथील नागरीकांनी मात्र गुंठेवारीचा एक हप्ता व नळ चार्जेस रू.१८००/- भरणे आवश्यक आहे. त्या ठिकाणी कॅम्प सुरू केलेले आहेत. ते सुरू राहतील. पुंडलिक नगर भागास पाणी देतांना सिडको-हडको भागाच्या पाण्यात कपात होणार नाही. या पध्दतीने नियोजन करावे. डिस्ट्रीब्युशन सिस्टीममध्ये सुधारणा करून तीन महिन्यात पुर्ण करावे. स.स.श्री.प्रशांत देसरडा यांच्या प्रश्नांना सात दिवसात उत्तर द्यावे. शहरात

| | |
|---|---|
| | अनधिकृत नळ कनेक्शन असतील तर ताबडतोब तोडावीत किंवा अभय योजने अंतर्गत नियमीत करावीत. विरोधी पक्षनेता यांनी सांगितल्यानुसार अनधिकृत कमर्शियल कनेक्शन शोधून काढावीत व त्यांच्यावर दंडात्मक कार्यवाही करण्यात यावी. ज्या लीगल सोसायट्यांनी बेटरमेंट चार्जेस भरलेले असतील त्यांनाही पाणी देण्यात यावे. |
| श्री.संतोष खेंडके | : प्रशासकीय विभागात बरेचसे इमारत निरीक्षक रजेवर गेलेले आहेत. श्री.साटोटे यांना स.स.सौ.रजनीताई जोशी यांच्या वार्डातील अतिक्रमण काढण्यासाठी सांगितले तर त्यांनी कर्मचारी नाहीत असो सांगितले. याचा खुलासा व्हावा. |
| मा.महापौर | : प्रशासकीय विभागातील तीन इमारत निरीक्षक रजेवर आहेत. त्यांची बदली करण्यात यावी व नवीन लोकांना देण्यात यावे. |
| सौ.रजनीताई जोशी | : माझ्या वार्डात अतिक्रमणे झालेले आहेत. परंतु काढलेली अतिक्रमणे परत होत आहे. श्री.साटोटे यांना माहिती आहे. ती काढावीत अतिक्रमण विभागास कर्मचारी देण्यात यावेत. |
| मा.महापौर | : श्री.साटोटे यांनी अतिक्रमण तात्काळ काढावे तसेच श्री.साटोटे यांना तात्काळ कर्मचारी व कार्यालय देण्यात यावे. |
| श्री.सय्यद खुसरो | : स्लम सेक्शन भागातुन कामे होत नाहीत. |
| मा.महापौर | : स्लम विभागामार्फतची कामे तात्काळ सुरू करण्यात यावीत. |
| श्री.शंशाक विसपुते | : मागे आपल्या देशावर आतंक वाद्यांनी हल्ला केला होता कारगील युध्दात शहीद झालेल्या जवानांच्या नावाने कारगील स्मृतीसाठी गारखेड्यात मोठा पार्क तयार करण्यात येत आहे. परंतु यासाठी जागा मोजून मार्कींग करून देण्यात आलेली नाही. जागेची मार्किंग करून देण्यात यावी. |
| मा.महापौर | : बाळकृष्ण नगर वार्डात मनपाची ६-७ एकर जागा होती हा भाग ग्रीन झोन होता. त्यावर मनपाच्या वतीने कारगील वन बनविण्यात येत आहे. सदर जागा १५ दिवसाच्या आत मोजणी करून द्यावी. व त्यावर संरक्षित भिंत बांधण्यात यावी. |
| श्री.संजय शिरसाठ | : शिवजयंती येत आहे, त्यानिमित्त क्रांती चौकातील शिवाजी महाराज पुतळ्याजवळील कारंजे तात्काळ सुरू करण्यात यावेत. |
| मा.महापौर | : क्रांती चौकातील कारंजे शिव जयंती निमित्त तात्काळ सुरू करण्यात यावेत. |
| श्री.अमोदी अबुबकर | : सहा.संचालक नगर रचना श्री राठोड यांची बदली झाली आहे त्यांना कार्यमुक्त का करण्यात येत नाही. २ तासापासून झोपतात. |
| मा.महापौर | : सध्या निवडणूका सुरू आहेत. याबाबत निवडणूक आयोगासाठी पत्रव्यवहार सुरू आहे. |

## नेमणूका

**विषय क्र. ७४८/१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील वर्ग-४ संवर्गातील खालील प्रमाणे कर्मचारी हे दैनिक वेतनावर कार्यरत आहेत.

| अ.क्र. | कर्मचारी यांचे नांव (सर्वश्री/श्रीमती) | पदनाम | कार्यरत विभाग | ठराविक/दैनिक वेतन |
|---|---|---|---|---|
| १. | दौलत किसन सलामबाद | मजूर | वॉर्ड-फ कार्यालय | रू.१७५/- |

सदरील कर्मचाऱ्यांना प्रशासनाच्या मान्यतेनुसार दैनिक वेतनावर नियुक्ती देण्यात आलेली आहे. संबंधिताच्या कामाच्या आवश्यकतेबाबत विभाग/शाखा प्रमुख यांनी अभिप्राय देवून मुदतवाढ देण्याबाबत शिफारस केलेली आहे. यापूर्वी त्यांना वेळोवेळी तांत्रिक खंड देवून मुदतवाढ देण्यात आलेली आहे. सध्या सदर कर्मचाऱ्यांची कामाची आवश्यकता असल्यामुळे व त्यांची मुदत दि.३१.१२.२००६ रोजी संपलेली असल्याने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३(१) व (३) नुसार उक्त कर्मचाऱ्यांस दोन दिवसाचा तांत्रिक खंड दि.४.१.२००७ ते दि.३०.६.२००७ पर्यन्त मुदतवाढ देण्याबाबत प्रस्ताव मा.सर्व साधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर : विषय मंजुर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील वर्ग-४ संवर्गातील खालील कर्मचारी यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३(१) व (३) नुसार दोन दिवसाचा तांत्रिक खंड देवून दि.४.१.२००७ ते दि.३०.६.२००७ पर्यन्त मुदतवाढ देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

| अ.क्र. | कर्मचारी यांचे नांव (सर्वश्री/श्रीमती) | पदनाम | कार्यरत विभाग | ठराविक/दैनिक वेतन |
|---|---|---|---|---|
| १. | दौलत किसन सलामबाद | मजूर | वॉर्ड-फ कार्यालय | रू.१७५/- |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७४९/२ :**

मा.आयुक्त यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सन २००६-०७ या शैक्षणिक वर्षात महानगरपालिका शालेय विद्यार्थ्यांना रंगीत गणवेष ०२ जोड व पांढरा गणवेष ०१ जोड देण्यात आला आहे. त्याच धर्तीवर डॉ.बाबासाहेब आंबेडकर गणवेष सहाय्य योजनेंतर्गत सन २००७-०८ या शैक्षणिक वर्षाकरीता गणवेष उपलब्ध करून द्यावयाचा आहे. महानगरपालिका शाळेतील विद्यार्थ्यांना शाळा सुरू झाल्याबरोबर गणवेष उपलब्ध करून देणेबाबत सन्माननिय पदाधिकाऱ्यांच्या सूचना आहेत. सदर खरेदी ही सन २००७-०८ या वर्षात करावयाची आहे. त्यामुळे जून २००७ मध्ये गणवेष देण्याकरीता निविदा प्रक्रिया पूर्ण करण्याची कार्यवाही चालू आर्थिक वर्षातच कार्यवाही सुरू करणे आवश्यक आहे.

शिक्षणाधिकारी यांनी लेखी दिलेल्या माहीतीनुसार विद्यार्थी संख्या २५११५ अशी दिली असून त्यामध्ये १०% नैसर्गिक वाढ विचारात घेवून त्यानुसार विद्यार्थ्यांना गणवेषाचा लाभ देणेबाबत शिफारस केली आहे.

सन २००७-०८ या शैक्षणिक वर्षाकरिता गणवेष खरेदी करतांना गणवेषाचा दर्जा व गुणवत्ता उच्चतम असावी या हेतूने केवळ उत्पादक कंपन्याकडून निविदा मागवून साहित्य खरेदी करण्यात येणार आहे. सदर गणवेष खरेदी करीता अंदाजे खर्च रक्कम रू. १.२५ कोटी एवढा अपेक्षित आहे. पुढील आर्थिक वर्षात याकरीता आवश्यक तरतूद करण्यास्तव तसेच प्रस्ताव विचारार्थ सादर.

अंदाजपत्रक मान्यतेस्तव प्रस्ताव सादर.

**संवाद :**

श्री.महेश माळवतकर : शिक्षणाधिकाऱ्यांनी २५११५ विद्यार्थी संख्या दर्शविली आहे. आपल्या शाळेत नेमके किती विद्यार्थी आहेत. मागील चार वर्षातील विद्यार्थी संख्या सांगावी. दरवर्षा वाढ होते का.

मा.महापौर : सध्या विद्यार्थी किती आहेत. मागील वर्षाच्या प्रमाणात या वर्षी किती वाढ झाली याची शिक्षणाधिकाऱ्यांनी माहिती द्यावी.

शिक्षणाधिकारी : शैक्षणीक वर्ष २००७-२००८ मध्ये २५११५ विद्यार्थी मनपा शाळेत आहेत. यामध्ये बालवाडीपासुन सातवी पर्यंतचे विद्यार्थी आहेत. तसेच प्रकल्प विभागाकडील बालवाड्यातील विद्यार्थ्यांची संख्या गृहीत धरली आहे. गणवेश मिळून वाटप होईपर्यंत विद्यार्थी संख्या वाढू शकते व घटूही शकते.

श्री.महेश माळवतकर : प्रत्येक वर्षी आपल्या शाळेतील विद्यार्थी २-५ टक्के कमी झालेले आहेत . मागील वर्षाचे काही गणवेश शिल्लक आहेत काय.

शिक्षणाधिकारी : मागच्या तुलनेत विद्यार्थी संख्या कमी झालेली आहे मात्र नैसर्गिक वाढ गृहीत धरावी लागते. सध्या २४६९५ विद्यार्थी आहेत.

मा.महापौर : मनपा शाळेतील विद्यार्थी संख्या सातत्याने कमी झाली आहे. मग ही १०% नैसर्गिक वाढ कशी धरण्यात आली. प्रस्तावीत विद्यार्थी संख्या परत एकदा तपासुन पाहावी.

श्री.प्रशांत देसरडा : शिक्षणाधिकाऱ्यांनी सांगितलेला आकडा हा रोलवर असणार आहे. केवळ ड्रेस व दप्तर देण्यासाठी विद्यार्थ्यांची नावे टाकण्यात येतात. प्रत्यक्ष शाळेत ५०-६०%उपस्थिती असते हे आम्ही दाखवुन दिलेले आहे. या वर्षा एजन्सीवाले व मनपाचे एक अधिकारी दोघे एकत्रच मुंबईस जात होते. एजन्सी धारकास कसे समजले हे काम आपणास मिळणार आहे. ही मनपाची फसवणूक आहे. मा.आयुक्तांनी विभाग प्रमुखास शाळेत पाठवले होते त्यांना विचारा रिपोर्ट काय आले. १ ड्रेस २ वर्ष टिकतो. २५% विद्यार्थी शाळेतच येत नाहीत. ड्रेसची क्वॉलीटी काय आहे. विभाग प्रमुखांनी पाहीले त्यांना विचारा.

श्री.महेश माळवतकर : प्रत्येक वर्षी गणवेश दिले जातात.परंतु त्याची क्वॉलिटी पाहिली जात नाही. अत्यंत हलक्या दर्जाचे ड्रेस खरेदी केले जातात. फरशी पुसण्याच्या लायकीचे नाही. चांगले असेल सत्कार करा.

श्री.संतोष खेंडके : हा विषय शिक्षण समितीचा आहे. तो शिक्षण समितीकडे पाठविण्यात यावा.

सौ.अजरा जबीन : यशोधरा कॉलनीत किती विद्यार्थी आहेत याची माहिती देण्यात यावी.

शिक्षणाधिकारी : सर्व शाळांची संख्या लक्षात ठेवणे शक्य नाही ती उपलब्ध आहे.

मा.महापौर : हा विषय शिक्षण समितीचा आहे. तो शिक्षण समितीकडे पाठविण्यात यावा. शिक्षण समितीने आठ दिवसात निर्णय घ्यावा. शिक्षणाधिकाऱ्यांना ताकीद देण्यात येते सभागृहात माहिती घेवून यावी.

शिक्षणाधिकारी : यशोधरा कॉलनीच्या शाळेत १७२ मराठी व ३२२ उर्दू माध्यमाचे विद्यार्थी आहेत.

श्री.खुसरो : एकाच हॉलमध्ये १ ली ते ४ थी चे विद्यार्थी शिकतात.

मा.महापौर : त्या शाळेची पाहणी करण्यात येईल.

श्रीमती खान मेहरून्नीसा : किराडपुरा नं ३ शाळेत एकाच वेळी ड्रेस घातले तर दुसरे वेळी घालता येत नाही. २-३ दिवसात एकदा खिचडी देण्यात येते.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे सदर प्रस्ताव माध्यमिक,पूर्व माध्यमिक व तांत्रिक शाळा समिती मार्फत ठेवण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७५०/३ :**

सहाय्यक संचालक नगर रचना,महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, महाराष्ट्र राज्य विद्यूत वितरण कंपनीस ड्रम प्रकल्पासाठी (Drum Project) औरंगाबाद शहराच्या भविष्यातील विजेची निकड व सुव्यवस्था वितरण विकासासाठी शहराच्या निरनिराळया विभागात ३३/११ के.व्ही.उपकेंद्र उभारण्यासाठी जमीन उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र राज्य विद्यूत वितरण कंपनी मर्यादित (सं.व.सु.) शहर मंडळ कार्यालय,औरंगाबाद यांचेकडून वारंवार मागणी करण्यात येत आहे.

संपूर्ण भारतामध्ये अशा प्रकल्पाचे आयोजन फक्त तीन राज्यात असून त्यापैकी महाराष्ट्र राज्य एक आहे. त्यानुसार आपल्या राज्यात औरंगाबाद शहर निवडण्यात आल्याचे उक्त कंपनीने कळविले आहे. सदर ड्रम प्रकल्प भारत सरकार व अमेरिका ( U.S.A. ) या दोन्ही देशाच्या संयुक्त सहभागा अंतर्गत (USAID ) विद्यूत वितरण प्रणालीमध्ये आमुलाग्र बदल घडवून आणण्यासाठी ''पथदर्शी प्रकल्प '' म्हणून औरंगाबाद शहराच्या ऐतिहासीक वारसा असल्यामुळे निवड करण्यात आल्याचे कळविण्यात आले आहे. हया प्रकल्पासाठी वीज वितरण कंपनीने अंदाजे रूपये २४० कोटी (रूपये दोनशे चाळीस कोटी फक्त) ची योजना मंजूर केल्याचे कंपनीने कळविले आहे.

उक्त वीज वितरण कंपनीला निरनिराळया ठिकाणी जागा उपलब्ध करून देतांना औरंगाबाद शहराच्या मंजूर विकास योजनेतील प्रस्तावांमध्ये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करणे आवश्यक आहे. उक्त कलम ३७ अन्वये मंजूर विकास योजनेत फेरबदल करण्यासाठी प्रत्येक वेळी मा.सर्व साधारण सभेसमोर वेळोवेळी प्रस्ताव ठेवण्याची आवश्यकता असल्यामुळे ड्रम प्रकल्पाची प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी बराच विलंब होण्याची शक्यता आहे. सदरचा विलंब टाळणेसाठी ड्रम प्रकल्पासाठी ज्या ज्या ठिकाणी जागा उपलब्ध करून देण्याची आवश्यकता असेल आणि त्या त्या ठिकाणी मंजूर विकास योजनेत उक्त कलम ३७ अन्वये फेरबदल करण्याची गरज आहे. अशा ठिकाणाचे फेरबदलाची कार्यवाही मा.सर्व साधारण सभेच्या परस्पर करण्याचे अधिकार आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद यांना प्रदान करणे आवश्यक आहे. ही कार्यवाही केल्यानंतर आयुक्त महासभेला माहितीसाठी ठेवतील. तरी वरील प्रमाणे प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री.किशनचंद तनवाणी : ड्रम प्रोजेक्ट काय आहे २०० कोटी गुंतवणूक होणार सविस्तर माहिती देण्यात यावी.

स.संचालक न.रचना : एमएसईबी संबंधीत जागेच्या फेरबददलाबाबत हा प्रस्ताव आहे.

शहर अभियंता : शहरातील ओव्हर हेड लाईटस अंडर ग्राऊंड करण्या बाबतचा आहे. सुरवातीस हा प्रकल्प शहरातील सराफा,गुलमंडी सारख्या कंजस्टेड भागात राबविण्यात येणार आहे.

मा.महापौर : अशा प्रकारचे काम केवळ देशातील चार शहरांमध्ये होणार आहे. त्यात आपल्या शहराचा समावेश आहे. या प्रकल्पासाठी केंद्र शासनातर्फे पैसे येणार आहेत यावर २४० कोटी खर्च होणार आहे.

श्री.किशनचंद तनवाणी : हा एक चांगला प्रोजेक्ट आहे. यासाठी केंद्र शासन २४० कोटीचे अनुदान देणार आहे. यासाठी नेमकी कोणती जागा हवी यासाठी कंपनी सर्वे करत आहे.

शहर अभियंता : या प्रकल्पासाठी कंपनीने कोकणवाडीच्या जागेची मागणी केलेली आहे.

मा.महापौर : यातुन शहरासाठी २४० कोटी रूपयाचे काम होणार आहे. कोकणवाडीचा जागा मागितलेली आहे. मार्केट व्हॅल्युनुसार पैसे देण्यास ते तयार आहेत. ज्याज्या वेळेस जागा लागेल तेव्हा प्रशासनाने जागेच्या उल्लेखासह सर्वसाधारण सभेसमोर प्रस्ताव ठेवावे.

सहा.संचालक न.रचना : ड्रम प्रोजेक्टसाठी साधारणत: १०-११ ठिकाणी जागा लागणार आहेत परंतु समाधान कॉलनी व चाणक्यपुरीच्या बाजुची मागणी आलेली आहे. जागेची मागणी आल्यानंतर सर्वसाधारण सभेसमोर येवून कार्यवाही करण्याबाबतचा प्रस्ताव आहे. शासनाकडे हा प्रस्ताव पाठवावयाचा आहे.

मा.उप महापौर : या प्रस्तावास कोणताही विरोध नाही. जागांचा प्रस्तावास उल्लेख यावयास हवा होता. भविष्यात ड्रम प्रोजेक्टसाठी जागा देण्याचा प्रस्ताव प्रत्येकवेळी सर्वसाधारण सभेसमोर यावयास हवा.

सहा.संचालक न.र. : औरंगपुरा जिल्हा परिषदच्या बाजूला सुलभ शौच्छालय समोर ३ ठिकाणचा प्रस्ताव आलेला आहे.

श्री.किशनचंद तनवाणी : ३ ठिकाणास मान्यता द्यावी. बाकीचे सर्वसाधारण सभेपूढे ठेवावे.

मा.महापौर : ड्रम प्रोजेक्टसाठी समाधान कॉलनी व चाणक्यपुरी,औरंगपुरा जिल्हा परिषदच्या बाजूला येथे जागा हवी आहे. ती देण्यात यावी. याचबरोबर भविष्यात लागणाऱ्या जागांचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर ठेवावेत. ३ ठिकाणास मान्यता देण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महाराष्ट्र राज्य विद्यूत वितरण कंपनीस ड्रम प्रकल्पासाठी (Drum Project) औरंगाबाद शहराच्या समाधान कॉलनी व चाणक्यपुरी,औरंगपुरा जिल्हा परिषदेच्या बाजूला या तीन ठीकाणाच्या जागा देणेस व याचबरोबर लागणाऱ्या जागांचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर ठेवण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**स.सदस्यांचे प्रस्ताव**

**विषय क्र. ७५१/४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,नारेगांव,ब्रिजवाडी,वॉर्ड क्र.२२ यामधील वसाहत व हा वॉर्ड अनुसूचित जातीकरिता राखीव असून हा वार्ड स्लम आहे. १००% दलित समाज व दारिद्रय रेषाखालील कुटूंब या वार्डामध्ये मोठया प्रमाणात आहे. त्याला या भागाचा विकास झाला नाही. दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत या वस्तीत कुठेच काम झाले नाही. केंद्र सरकार व महाराष्ट्र सरकार मार्फत जे दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत जो पैसा येतो तो पैसा या वार्डामध्ये खर्च करणयात यावा. मुलभूत सुविधा देण्यात याव्या.

१) नवीन ड्रेनेज लाईन.

२) नवीन पाण्याच्या लाईन.

३) रस्ते डांबरीकरण करणे,खडीकरण करणे,पिवर ब्लॉक बसविणे.

४) नाल्या,सांडपाणी जाण्याकरिता व्यवस्था करणे.

हे सर्व काम करण्याकरिता ब्रिजवाडी लगत वस्त्यामध्ये व नारेगांव वस्त्यामध्ये काम करण्याकरीता ५०,००,०००/- (पन्नास लाख) रूपये २००६ ते २००७ च्या अर्थसंकल्पात ठेवण्यात यावा. करिता सर्वानुमते ठेवण्यात यावा. करिता सर्वानुमते सदर प्रस्ताव मंजूरीसह सादर.

सुचक: सौ. शंकुतलाबाई इंगळे, सौ.सुशिला रगडे अनुमोदक: श्री संजय शिरसाट

मा.महापौर : विषय मंजुर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, नारेगांव,ब्रिजवाडी,वॉर्ड क्र.२२ यामधील वसाहतीमध्ये विविध विकास कामे करण्यासाठी ५०,००,०००/- (पन्नास लाख) रूपये २००६ ते २००७ च्या अर्थसंकल्पात ठेवण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.७५२/५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मिसारवाडी नारेगांव वॉर्ड क्र.२१ यामधील वसाहत व हा वॉर्ड अनुसूचित जाती करिता राखीव असून हा वॉर्ड स्लम आहे. १००% दलित समाज व दारिद्रय रेषेखालील कुटूंब या वॉर्डामध्ये मोठया प्रमाणात आहेत. त्यात या भागाचा विकास झालेला नाही. दलित वस्ती सुधार योजनेतील नवीन ड्रेनेज लाईन व पाणी पुरवठयाची लाईन र.रू. १,००,००,०००/- टाकण्यासाठीचा प्रस्ताव मंजूर करून जिल्हाधिकारी कार्यालयास पाठविण्यात यावा.

करिता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

सुचक : श्रीमती शकुंतला इंगळे अनुमोदक : श्री.संजय शिरसाट, श्रीमती सुशिला भगवानराव रगडे

**संवाद :**

श्री.जावेद कुरैशी : इतर वार्डातही असे कामे करावे.

मा.महापौर : हा निधी शासनाकडून मिळतो मंजुर करण्यात येतो. या शिवाय असे दुसरेही प्रस्ताव आलेले आहेत.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मिसारवाडी नारेगांव वॉर्ड क्र.२१ यामधील वसाहतीमध्ये दलित वस्ती सुधार योजनेतील नवीन ड्रेनेज लाईन व पाणी पुरवठयाची लाईन र.रू.१,००,००,०००/- टाकण्यासाठीचा प्रस्ताव सर्वानुमते मंजुर करण्यात येऊन सदरील प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयास पाठवणेस सर्वानुमते मान्यता देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.७५३/६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, पिरबाजार चौकातील भाजीवाली बाई पुतळा ते एकता चौक ते सुतगिरणी चौक या रस्त्यास प.पु.कै.माधव गोलवळकर गुरूजी मार्ग असे नाव देण्याचा प्रस्ताव सर्व साधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक : सौ.विजया रहाटकर, श्री.संजय जोशी, श्री.अ.साजेद अ.सत्तार

अनुमोदक : श्रीमती डॉ.आशा बिनवडे, श्री.भाऊसाहेब ताठे, श्री.संतोष खेंडके पाटील, श्री.मधुकर सावंत.

**संवाद :**

श्री.अ.रशिद मामु : शहानुरमियॉ दर्गाह ते पुढे जोड रस्ता आहे, त्यास हे नांव देण्याची दुरूस्ती व्हावी.

मा.महापौर दुरूस्तीसह मंजुर. एकता चौक ते शामाप्रसाद मुखर्जी चौक पर्यंतच्या रस्त्यास कै.माधवराव गोलवळकर गुरूजी असे नाव देण्यास सर्वानुमते मंजुरी

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, एकता चौक ते शामाप्रसाद मुखर्जी चौक पर्यंतच्या रस्त्यास प.पु.कै.माधवराव गोलवळकर गुरूजी मार्ग नाव देणे अशा दुरूस्तीसह प्रस्तावास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.७५४/७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, (१) महानगरपालिका औरंगाबादला शासनाने ११२४ दैनिक वेतनावरील कर्मचाऱ्यांना कायम करण्याचे आदेश दिले होते. या शासन आदेशातील अटीचे पालन करण्याची जबाबदारी महानगरपालिका आयुक्तावर टाकण्यात आली होती. या भरती प्रकरणात मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार झाल्याचे पुराव्यासहीत दाखविण्यात आले आहे. सर्व साधारण सभा आणि स्थायी समिती सभेमध्ये या संबंधी चर्चा देखील करण्यात आली होती.महानगरपालिका आणि शासनाकडे या संबंधी पत्रव्यवहार देखील करण्यात आला. त्यानुसार चौकशीस आरंभ झाला होता परंतु चौकशीत काय निष्पन्न झाले अद्याप कळविण्यात आले नाही. करीता या भरती प्रकरणात अन्याय झालेल्या कर्मचाऱ्यास न्याय देण्यात यावा. त्याच प्रमाणे दोषी अधिकाऱ्यावर कार्यवाही करण्यात यावी. करीता सर्व साधारण सभेत प्रस्ताव मंजुरी व योग्य कार्यवाहीस्तव सादर.

विषय : (२)

स्थायी समितीमध्ये मा.सभापती यांनी दिनांक २३.०२.२००६ रोजी जकात पावती पुस्तकाची तपासणी करण्याचे आदेश दिले होते. जकात पावती पुस्तकातील गैरव्यवहार प्रकरणी चौकशीमध्ये दोषी ठरलेल्यावर योग्य ती कार्यवाही करावी. तसेच महानगरपालिकेस झालेल्या आर्थिक भरपाई करणेसाठी व पुढील कार्यवाहीसाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेत सादर.

सुचक : श्री.मुजीब आलम शाह खान अनुमोदक : श्री.किशोर तुलसीबागवाले

**संवाद :**

श्री.मुजीब खान : ११२४ च्या भरतीबाबातचा पुराव्यासह मी दाखवले आहे की ही भरती चूकीची आहे. मा.हायकोर्टाने आदेश दिलेले होते. यादीवरील लोक तसेच राहिले बाहेरील लोक भरण्यात आले. यात काही अधिकाऱ्यांचे नातेवाईक आहेत. १८ महिन्यापासुन चौकशी चालू आहे. १५ दिवसात चौकशी करणार होते काय झाले.

मा.महापौर : सहा.आयुक्त -१ यांनी खुलासा करावा.

श्री.संजय शिरसाठ : उप आयुक्त अपस्थित असतांना सहा.आयुक्त खुलासा कसा करतात.

उप.आयुक्त म. : ११२४ या दैनिक वेतनावरील कर्मचाऱ्यांची भरती २००३-२००४ या वर्षात मनपाने न्यायालयीन निर्णय व शासनाने त्या संबंधीची पदे मंजुर केली होती. त्याच्या आधारे केली होती साधारणत: फेब्रुवारी २००६ मध्ये या संदर्भात तत्कालीन मुख्य लेखा परिक्षक यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमण्यात आली होती यामध्ये प्रमुख तीन आरोप होत. जे उमेदवार यादीत आहेत त्या ऐवजी इतर उमेदवार नेमलेत. जे दैनिक वेतनावर नव्हते त्यांना नेमले वयामध्ये न बसणाऱ्या उमेदवारांचा समावेश ११२४ मध्ये करण्यात आला. श्री.कमलाकर फड यांच्याकडे चौकशीचे काम चालू आहे. ३.२.२००७ रोजी मुख्य लेखा परिक्षक यांनी प्रशासनास एक अहवाल सादर केलेला आहे. यामध्ये २४८ प्रकरणांची तपासणी करून ४८ प्रकरणात ज्या उमेदवारांची नियुक्ती संशयास्पद वाटते.

श्री.संजय शिरसाठ : चौकशी समितीच्या अहवालाचे काय झाले त्याचा खुलासा करावा.

श्री.मुजीब खान : यादी व्यतिरीक्त किती लोक घेतलेले आहेत याची माहिती द्यावी. मी अशा कर्मचाऱ्यांची नावे दिलेली आहेत. यासाठी स्वतंत्र सभा ठेवण्यात यावी.

उप आयुक्त म. : मुख्य लेखा परिक्षकांच्या अहवालात याबाबत कुठलाही खुलासा नाही.

श्री.संतोष खेंडके : हा गंभीर विषय आहे. यासाठी स्वतंत्र सभा घ्यावी. व चौकशी अहवालच्या प्रती सगळ्यांना देण्यात याव्यात.

श्री.मुजीब खान : जकात विभागात झालेल्या भ्रष्टाचाराबाबत मी प्रश्न विचारला होता. सात पावती पुस्तकांवर केवळ दुकानदाराची नावे लिहिलेली आहेत. त्यांचे पत्ते नाहीत यात मोठा भ्रष्टाचार आहे. सर्वांना अहवाल द्यावा. विशेष सभा लावण्यात यावी. अन्यथा मा.उच्च न्यायालयात प्रकरण नेण्यात येईल.

मा.महापौर : विशेष सभा घेतली जाईल. तत्पूर्वी अहवाल सर्व सदस्यांना दिले जाईल.

उप आयुक्त म. : २४.२.२००६ रोजी तत्कालीन स्थायी समितीने मुख्य लेखा परिक्षक यांचे अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमली होती समितीने अहवाल सादर केलेला आहे. त्यात जकात नियम २(२१) नुसार व्यापाऱ्यांनी जकात कर योग्य भरला आहे किंवा नाही याची तपासणी दरवर्षी फेब्रुवारी/मार्च महिन्यात करण्यात येते. तपासणी करताना आढळून आले की व्यापाऱ्याने जकात कर बरोबर भरला नसेल तर व्यापाऱ्याने व्हॉलंटीरीली डिस्क्लोज करून मनपास फरकाची रक्कम जमा करावी लागते. २००३-०४ या वर्षात एकुण ४७,९३,०००/- एवढा महसुल जमा करण्यात आला होता २००४-०५ या वर्षात ५१,५०,०००/- एवढा महसुल जमा करण्यात आला मुख्य लेखा परिक्षकांनी त्यांच्या अहवालात म्हटले आहे की जेवढी रक्कम मनपाच्या पथकाने जमा केलेली आहे. तेवढी रक्कम मनपाच्या तिजोरीत भरलेली आहे.

श्री.मुजीब खान : यात भ्रष्टाचार झालेला आहे. एके ठिकाणी रक्कम वसुल केल्याबद्दल पावत्या फाडलेल्या आहेत. पावत्यांवर दुकान एरीयाचे नाव नाही वर्षभरात दुकानदाराने किती माल आणला, किती जकात भरली याचा उल्लेख नाही. ही माहिती मी वारंवार मागत आहे परंतु देत नाहीत.

श्री.संजय शिरसाठ : हा विषय आपण स्पेशल मिटींगमध्ये घेणार असाल तर श्री.बांडे याने केलेल्या अडीच लाखाच्या व त्यात सहभागी असलेल्या लोकांची माहितीही देण्यात यावी.

मा.महापौर : प्रशासनाकडे आलेल्या चौकशी अहवालाची प्रत सर्व सदस्यांना देण्यात यावी त्यानंतर या विषयावर स्पेशल मिटींग घेण्यात येईल. श्री.बांडे यांच्या भ्रष्टाचाराचीही माहिती देण्यात यावी.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्तावा संबंधी प्रशासनाकडे आलेल्या चौकशी अहवालाची प्रत सर्व सदस्यांना देण्यात यावी व त्यानंतर या विषयावर विशेष सभा घेणेत येईल. तसेच श्री.बांडे यांच्या भ्रष्टाचाराचीही माहिती देण्यात यावी. असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.७५५/८ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिकेतर्फे शहरातील विविध प्रभागामध्ये पेव्हींग ब्लॉक बसविण्याची कामे मोठ्या प्रमाणात करण्यात येतात. या वर्षी जवळपास १.५० ते २.०० कोटी रूपयाचे कामे होणार आहेत. पेव्हींग ब्लॉकचा बाजारभाव आणि डी.एस.आर चे दर यामध्ये मोठी तफावत असल्यामुळे सर्व कामासाठी लागणारे पेव्हींग ब्लॉक एकत्रितरित्या खरेदी केल्यास महानगरपालिकेचे लाखो रूपयाचे बचत होऊ शकते. करीता सर्व कामासाठी लागणारे पेव्हींग ब्लॉक खरेदी करून महानगरपालिकेमार्फत पुरविण्याची व्यवस्था करणे उचित होईल. करीता प्रस्तावात दर्शविल्या नुसार कार्यवाही करण्यासाठी प्रस्ताव मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

सुचक : श्री.संजय पांडूरंग शिरसाट अनुमोदक : श्री.त्र्यंबक तुपे, श्री.विनायक पांडे

**संवाद :**

श्री.संतोष खेंडके : रद्द करावा.

सौ.रजनी जोशी : अनुमोदक नाही.

मा.महापौर : अनुमोदक नाही. रद्द करण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्तावाचे अनुमोदक उपस्थित नसल्यामूळे प्रस्ताव रद्द करणेस मान्यता देण्यांत आली.

**विषय क्र.७५६/९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.'क' मध्ये अर्थसंकल्पातील पान क्र.डब्ल्यु-१०८ मध्ये १२.०० लक्ष व ८.०० लक्ष ची तरतुद आहे. तरी वार्ड क्र.२८ मध्ये नेहरूनगर, अंतर्गत विविध ठिकाणी जी.आय.पोल व लाईट फिटींग करीता ३.०० लक्ष उपलब्ध करून द्यावे प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्रीमती खान मेहरून्नीसा हमीद खान अनुमोदक : श्री.अ.साजेद अ.सत्तार

**संवाद :**

श्री.संतोष खेंडके : ही रक्कम सर्व वार्डासाठी समान असावी.

मा.महापौर : मंजुर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,वार्ड क्र.'क' मध्ये अर्थसंकल्पातील पान क्र.डब्ल्यु-१०८ मध्ये १२.०० लक्ष व ८.०० लक्ष ची तरतुद आहे. तरी वार्ड क्र.२८ मध्ये नेहरूनगर, अंतर्गत विविध ठिकाणी जी.आय.पोल व लाईट फिटींग करीता र.रू.३.०० लक्ष उपलब्ध करून देणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

मा.महापौर : १० ते १३ विषय मंजुर करण्यांत येते.

**विषय क्र.७५७/१० :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की वार्ड क्र ०९ मध्ये नेत्र तपासणीचे साहित्य खेदीसाठी अर्थसंकल्पात पान क्र.डब्ल्यु-१८२ वर २.०० लक्ष ची तरतुद करण्यात आलेली आहे. तथापी याऐवजी प्रभाग क्र.०९ मध्ये नंदनवन कॉलनी येथील उद्यानात संगीत कारंजासाठी वळती करून लेखाशिर्षकात बदल करण्याचे प्रस्ताव सर्वानुमते मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.ठाकुर पुरूषोत्तम अनुमोदक : श्री.संतोष खेंडके पाटील, श्री.के.व्ही.मोरे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,वार्ड क्र ०९ मध्ये नेत्र तपासणीचे साहित्य खरेदीसाठी अर्थसंकल्पात पान क्र.डब्ल्यु-१८२ वर २.०० लक्ष ची तरतुद करण्यात आलेली आहे. तथापी याऐवजी प्रभाग क्र.०९ मध्ये नंदनवन कॉलनी येथील उद्यानात संगीत कारंजासाठी वळती करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.७५८/११ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, दिनांक १८.०२.२००७ रोजी स्व.प्रा.के.एम.चव्हाण सर यांच्या स्मृती दिनानिमीत्त केशरबाई चव्हाण शिक्षण संस्थेचे संस्थापक सचिव स्व.प्रा.के.एम.चव्हाण यांचे शिक्षण क्षेत्रातील भरीव काम लक्षात घेता बंजारा समाजातील या नेत्याचे नांव त्या संस्थेच्या मेहेरसिंग नाईक या हायस्कुल जवळच असलेल्या जानकी हॉटेल समोरील चौकास स्व.प्रा.के.एम.चव्हाण चौक असे नाव देऊन त्या चौकाचे नामकरण महानगापालिकेतर्फे करण्यात यावे करीता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

सुचक : श्री.शशांक विसपुते, श्री.नारायण कुचे   अनुमोदक : श्रीमती डॉ.आशा बिनवडे,श्री.संजय रिडलॉन

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मेहेरसिंग नाईक हायस्कुल जवळ असलेल्या जानकी हॉटेल समोरील चौकास स्व.प्रा.के.एम.चव्हाण चौक असे नाव देणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.७५९/१२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.९६ हा गोर गरीब मोलमजुरी करणारे रहिवासी यांचा प्रभाग असुन त्या ठिकाणी वाचनालय नसल्याने गरीब रहिवासी यांना आर्थिक त्रास सहन करावा लागतो. गरीब लोकांच्या सुविधेसाठी सध्या महानगरपालिका प्राथमिक शाळा उर्दु ज्या शाळेत चालते त्याच शाळेत एक रूम भाड्याने घेऊन त्यात वाचनालय सुरू करण्या करीता तथा येणाऱ्या संभावित खर्चास महानगरपालिका अर्थसंकल्व सन २००७-२००८ मध्ये समावेश करण्याकरीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्रीमती मोमीन सफिया फिरदौस अय्युब खान

अनुमोदक : श्री.अ.साजेद अ.सत्तार, श्री.अ.रशिद खान (मामु)

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.९६ मधील महानगरपालिका प्राथमिक शाळा उर्दु शाळेत एक रूम भाड्याने घेऊन त्यात वाचनालय सुरू करण्यास व येणाऱ्या संभाव्य खर्चास अर्थसंकल्प सन २००७-२००८ मध्ये समावेश करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.७६०/१३ :**

प्रसताव सादर करण्यात येतो की, राज्यातील खेळाडूंना वाव मिळावा या उद्देशाने ''राज्यस्तरीय महापौर चषक किक बॉक्सींग स्पर्धा'' औरंगाबाद जिल्हा किक बॉक्सींगच्या सहकार्याने आयोजीत करण्यात यावी करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक : सौ.विमलताई बेंद्रे   अनुमोदक : श्री.संजय जोशी

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,राज्यातील खेळाडूंना वाव मिळावा या उद्देशाने ''राज्यस्तरीय महापौर चषक किक बॉक्सींग स्पर्धा'' औरंगाबाद जिल्हा किक बॉक्सींगच्या सहकार्याने आयोजीत करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

मा.महापौर : पुरवणीचे दोन विषय व ऐनवेळचे प्रशासकीय व स.सदस्यांचे सर्व विषय मंजुर करण्यांत येते.

**पुरवणी विषय**

**विषय क्र.७६१/१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, राज्यातील खेळाडुंना वाव मिळावा या दृष्टीकोनातुन ''राष्ट्रीय पातळीवर महापौर चषक श्री शरीरसौष्ठव स्पर्धा'' महाराष्ट्र बॉडी बिल्डर्स असोसिएशन यांच्या सहकार्याने आयोजीत करण्यात यावी, तसेच यासाठी येणाऱ्या संभावीत खर्चासह मान्यतेस्तव प्रस्ताव सर्वानुमते मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.संतोष खेंडके पाटील अनुमोदक : श्री.राजेश व्यास

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, राज्यातील खेळाडुंना वाव मिळावा या दृष्टीकोनातुन ''राष्ट्रीय पातळीवर महापौर चषक श्री शरीरसौष्ठव स्पर्धा'' महाराष्ट्र बॉडी बिल्डर्स असोसिएशन यांच्या सहकार्याने आयोजीत करण्यास तसेच यासाठी येणाऱ्या संभाव्य खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७६२/२ :**

दि.१५.१२.२००६ रोजीच्या सर्व साधारण सभेतील विषय क्र.६०५/१ अन्वये दि. २७.१०.२००६ रोजीच्या इतिवृत्त कायम करणेबाबत विषय क्र.५५० विद्यूत पर्यवेक्षकाचे पदनाम बदलणेचा प्रस्ताव इतिवृत्त कायम करतांना स्थगित ठेवला होता. त्याविषयाचे इतिवृत्तास देण्यात आलेली स्थगिती उठवून कायम करण्यास मान्यता व्हावी. करिता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

सुचक: श्री रविकांत गवळी अनुमोदक: स.स.श्री राजु वैद्य, स.स.श्री संतोष खेंडके, स.स.श्री त्रिंबक तुपे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,दि.१५.१२.२००६ रोजीच्या सर्व साधारण सभेतील विषय क्र.६०५/१ अन्वये दि. २७.१०.२००६ रोजीच्या इतिवृत्त कायम करणेबाबत विषय क्र.५५० विद्यूत पर्यवेक्षकाचे पदनाम बदलणेचा प्रस्तावास इतिवृत्त कायम करतांना ठेवलेली स्थगिती उठवण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**ऐनवेळचे विषय**

**विषय क्र. ७६३ :**

सहाय्यक संचालक नगर रचना, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मौजे भावसिंगपुरा येथील सर्वे नंबर २१/ पैकी मधील जमीन औरंगाबाद शहराची (वाढीव हद्द) मंजुर विकास योजनेतील १२.०० मीटर रूंद रस्त्याच्या प्रस्तावात भागश: बाधीत होत आहे. उक्त रस्त्यात बाधीत क्षेत्रासाठी मिळकतीचे हितसंबंधीत श्री.एस.एम.गायकवाड, प्रवर्तक, नियोजीत महात्मा ज्योतिबा फुले हौसिंग सोसायटी, औरंगाबाद यांनी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम-१२७ अन्वये खरेदी सुचना दिलेली आहे.

उक्त मंजुर विकास योजना सन १९९१ मध्ये अमलात आली असल्याने दहा वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला आहे. त्यामुळे संबंधिताने कलम-१२७ अन्वये दिलेली खरेदी सुचना लागु होते.

उक्त मिळकती मधील संबंधिताच्या जमीनीचे अंदाजे १५००.०० चौ.मी.क्षेत्र बाधीत होते परंतु उक्त रस्त्याचा रहदारीस वापर होणे आणि आरक्षणाचा हेतु सफल होण्यासाठी उक्त सर्वे नंबर मधील उर्वरीत क्षेत्राचे भूसंपादन करणे आवश्यक आहे. अशा प्रकारे अंदाजे ३७६०.०० चौ.मी.बाधीत क्षेत्र संपादीत करावे

लागेल. उक्त बाधीत क्षेत्राचा मोबदला सद्याच्या शिघ्र सिध्द गणकातील दरानुसार अंदाजे रक्कम रुपये २७.०० लक्ष होईल.

संबंधिताने उक्त हौसिंग सोसायटीचा ठराव दिनांक २१/०९/२००६ रोजी दाखल केल्याने उक्त खरेदी सूचनेतील भूसंपादनाचा रितसर प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचेकडे दिनांक २०/०३/२००७ पुर्वी पाठविणे आवश्यक आहे. अन्यथा सदरील आरक्षण मुक्त/व्यपगत होईल.

करीता उपरोक्त आरक्षणा खालील क्षेत्र संपादन करण्यासाठी व त्यास लागणारा भूसंपादन खर्चासह प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मौजे भावसिंगपुरा येथील सर्वे नं २१ पैकी नियोजीत महात्मा ज्योतिबा फुले हौसिंग सोसायटी, व इतर यांची १२ मीटर रूंद मंजुर विकास योजना रस्त्याने बाधीत मिळकती रितसर भूसंपादन करण्यास प्रस्तावीत भूसंपादनाच्या खर्चासह सर्वानुमते मंजुरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७६४ :**

औरंगाबाद शहर हे पर्यटनाच्या दृष्टीने महत्वाचे शहर असून, जगभरातून पर्यटक वेरूळ,अजिंठा, पानचक्की, औरंगाबाद लेणीसह स्थानिक पर्यटकस्थळांना भेटी देण्यासाठी येत असतात. मराठवाडयाचे प्रमुख शहर असल्यामुळे पर्यटनाव्यतिरीक्त शासकीय कामकाज,व्यापार उद्यीम व अन्य व्यावसायीक तसेच ग्राहक औरंगाबाद शहरास भेटी देत असतात. शैक्षणिक महत्वाच्या दृष्टीने विद्यापीठ व अभियांत्रिकी,वैद्यकीय महाविद्यालये,विधी महाविद्यालये इत्यादीत शिक्षण घेणारी अनेक विद्यार्थी शहरात येत असतात शहरालगत असलेल्या खेडयामधील व औद्योगिक वसाहतीतील नागरीक नित्य कामकाजासाठी शहरात येत असतात. शहरात फिरतांना महानगरपालिकेतर्फे उभारण्यात आलेली सार्वजनिक स्वच्छतागृहाची (सार्वजनिक मुताऱ्या व शौचालये) संख्या अत्यंत तोकडी असल्याबद्दल व त्यांची आजची स्थिती असमाधानकारक असल्याबद्दल नागरिकांच्या प्रतिक्रिया विविध वर्तमानपत्रे व व्यासपिठावरून उमटत असतात.

सन २००५-०६ मध्ये संत गाडगे महाराज स्वच्छता अभियान अंतर्गत तिसऱ्या फेरीच्या तपासणीसाठी आलेल्या पथकानेही शहरातील सार्वजनिक स्वच्छतागृहाची संख्या पुरेशी नसल्यशामुळे नाराजी व्यक्त केली होती. वरील सर्व परिस्थिती पाहता शहरामध्ये सुलभ सुविधा केंद्राची उभारणी करणे आवश्यक आहे.

औरंगाबाद शहरात सर्व सोईनी युक्त असलेले सुविधा केंद्र उभारण्यासंदर्भाने सुलभ इंटरनॅशनल सोशल सर्व्हीस ऑर्गनायझेश,मुंबई या संस्थेनी औरंगाबाद शहराचे सर्व्हेक्षण करून एकूण विविध ३५ ठिकाणी सुलभ सुविधा केंद्र उभारण्याबाबत व **पैसे द्या व वापरा** या तत्वावर पुढे चालविण्यास तयार असल्याचे कळविले आहे. सदर संस्थेमार्फत महाराष्ट्रातील महानगरपालिका,नगरपालिका,शासकीय वैद्यकीय महाविद्यालय परिसर,बृहन्मुंबईतील गलिच्छ वस्ती सुलभ सुविधा केंद्राची उभारणी केली आहे. तसेच ग्रामीण स्वच्छता कार्यक्रम अंतर्गत ग्रामीण भागात सामुहीक स्वच्छता ग्रहाची उभारणी केली आहे. तसेच इतर राज्यातही सुलभ शौचालये क्रेंद्राची उभारणी केली आहेत.

सुलभ इंटरनॅशनल सोशल सर्व्ही ऑर्गनायझेशन,मुंबईचे मार्फत सुलभ सुविधा केंद्र (सुलभ शौचालय,मुतारी व स्नानगृह संकुल) उभारणी संदर्भाने पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,मंत्रालय,मुंबई यांचे मार्गदर्शक तत्व दि.१ जून २००४ अन्वये प्रसिध्द झालेले आहे. राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व संलग्नीत रूग्णालयांतर्गत सुलभ शौचालय व स्नानगृह सुविधा उपलब्ध करून देणेबाबत

महाराष्ट्र शासन,शासन निर्णय क्रमांक एम.आय.एस.-२००३/प्र.क./९९/प्रशा-२ वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभाग. मंत्रालय मुंबई दिनांक १९ सप्टेंबर २००३ अन्वये मार्गदर्शक तत्वे प्रसिध्दी झालेली आहेत.बृहन्मुंबईतील गलिच्छ वस्तीत प्रायोगिक तत्वावर सुलभ शौचालय बांधणे बाबत महाराष्ट्र शासनाच्या गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग,मंत्रालय मुंबई यांचे शासन शुध्दीपत्रक क्रमांक गवसु १०८८/सी.आर.२०१८/शास-२/का-७ मंत्रालय मुंबई दिनांक २३.०२.१९८९ अन्वये मार्गदर्शक तत्वे नमुद केली आहे.

सुलभ सुविधा केंद्र (सुलभ शौचालय,मुतारी व स्नानगृह संकुल) उभारणीसाठी नकाशे व अंदाजपत्रके तयार करणे संदर्भाने शासनाचे Government of Maharashtra,Revenue and Forest Department, Govt. Resolution Number LP-10-01/CR-4/F-1, Mantralaya Mumbai Dated 07 June 2001 चे शासन निर्णयात सुलभ इंटरनॅशनल सोशल सर्व्हीस आर्गनायझेशन, मुंबई या संस्थे मार्फत राबविण्यासाठीचे मार्गदर्शक तत्वे नमुद केली आहेत .महाराष्ट्र शासनाच्या पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे दिनांक ०१ जुन २००४ चे पत्रानुसार सुलभ इंटरनॅशनल सोशल सर्व्हीस ऑर्गनायझेशन ,मुंबई या संस्थेस विना निविदा काम देण्याबातचे मार्गदर्शन केलेल आहे. शासनाच्या वरील मार्गदर्शक तत्वाआधारे औरंगाबाद महानगरपालिकेमार्फत निविदा न मागविता शहरात २० ठिकाणी सुलभ सुविधागृह (मुतारी, शौचालय व स्नानगृह संकुल) उभारणी करणे व **पैसे द्या व वापरा** या तत्वावर सुलभ इंटरनॅशनल सोशल सर्व्हीस ऑर्गनायझेशन , मुंबई या संस्थेस चालविण्यास देणे हे काम करता येईल. त्यासाठी आवश्यक्तेनुसार शासनाकडून परवानगी घेण्यात येईल. पुढील अटी व शर्ती आधारे सदरील सुलभ सुविधा केंद्राची उभारणी करण्यात येईल.

१. सुलभ सुविधा केंद्रासाठी (मुतारी, शौचालय व स्नानगृह संकुलासाठी) आवश्यक तितकी अथवा उपलब्ध मोकळीजागा महानगरपालिकेमार्फत निश्चित करून सुलभ इंटरनॅशनल सोशल सर्व्हीस ऑर्गनायझेशन, मुंबई या संस्थेस बांधकामासाठी देण्यात येईल, मात्र या जागेची मालकी महानगरपालिकेचीच राहील.

२. सुलभ सुविधा केंद्राच्या बांधकामाबाबत महानगरपालिकेच्या प्रचलीत धोरणानुसार सार्वजनिक बांधकाम विभाग औरंगाबाद परिक्षेत्राचे चालू दरसुचीनुसार आधारीत अंदाजपत्रके व नकाशे सुलभ इंटरनॅशनल सोशल सर्व्हीस ऑर्गनायझेशन, मुंबई या संस्थेने तयार करावी व त्यास औरंगाबाद महानगरपालिकेची तांत्रिक व प्रशासकीय मान्यता घ्यावी. तद्नंतर बांधकाम सुरू करण्याबाबत महानगरपालिकेतर्फे परवानगी देण्यात येईल.

३. सुलभ सुविधा केंद्र प्रथमत: ३० वर्षे सुलभ इंटरनॅशनल सोशल सर्व्हीस ऑर्गनायझेशन ,मुंबई या संस्थेने चालविणे बंधनकारक राहील. त्याच्या देखभालीसाठी लागणारी अस्थापना व त्यावर येणारा खर्च तसेच सुविधा केंद्राची देखभाल दुरूस्ती, पाणीपट्टी, विज बील इत्यादी साठीचा खर्चही संस्थेस करावा लागेल.

४. सुलभ सुविधा केंद्रावर विज पुरवठा व पाणी पुरवठ्याची व्यवस्था करणेसाठी सुलभ इंटरनॅशनल सोशल सर्व्हीस ऑर्गनायझेशन, मुंबई या संस्थेस स्वखर्चाने स्वतंत्र मिटर बसविणे बंधनकारक राहील.

५. सुलभ सुविधा केंद्राची (मुतारी, शौचालय व स्नानगृह संकुल) संपुर्ण स्वच्छता राखण्याची जबाबदारी सुलभ इंटरनॅशल सोशल सर्व्हीस ऑर्गनायझेशन, मुंबई यांची राहील. त्यासाठी आवश्यक साहित्य उदा. फिनेल,डिटर्जेट, झाडू इत्यादीवरील खर्च संस्थेस करावा लागेल.

६. सुलभ सुविधा केंद्रात असलेली मुतारीची सेवा मोफत राहील. शौचालयाच्या वापरासाठी प्रति व्यक्ती रूपये २/- व स्नानगृहाच्या वापरासाठी प्रति रूपये ३/- प्रमाणे शुल्क आकारणे तसेच गोरगरीब जनतेसाठी १०% सुविधा मोफत पुरविणे सुलभ इंटरनॅशनल सोशल सर्व्हीस ऑर्गनायझेशन, मुंबई या संस्थेस बंधनकारक राहील. सदर दर,सदरहू सुविधा सुरू झाल्याच्या दिनांकापासुन प्रथमत: पाच वर्षासाठी राहतील व त्यानंतर स्थानिक परिस्थितीचा विचार करून आढावा घेऊन वाढीव दरांचा निर्णय घेण्यात येईल.

७. सुलभ सुविधा केंद्राच्या दर्शनी भागात जाहीरात फलक उभारणीस संस्थेस परवानगी देण्यात येईल. महानगरपालिकेने निर्धारीत केलेल्या दरानुसार सदर जाहीरात शुल्कापोटी जमा होणारे शुल्काच्या ५०% रक्कम महानगरपालिकेस जमा करणे बंधनकारक राहील. सदर जाहीरात फलक उभारणीचा सुस्थितीत राखण्याचा व त्यासाठी आवश्यक असलेली विद्युत व्यवस्था करण्याचा संपूर्ण खर्च संस्थेस करावचा लागेल.

८. सुलभ सुविधा केंद्राचे बांधकाम करण्यासाठी अंदाजपत्रक तयार करतांना त्यात प्रामुख्याने खालील बाबींचा समावेश असेल.

अ) स्थापत्य विषयक कामे

ब) विद्युतीकरणाचे कामे

क)Implementation Charges (अ+ब च्या २०%वाढीव)

एकुण अंदाजपत्रकीय रक्कमेमध्ये अ+ब+क चा समावेश असेल.

९. सुलभ सुविधा केंद्राचे प्रत्यक्ष बांधकाम सुरू करण्यापुर्वी वरील प्रमाणे अंदाजपत्रकीय रक्कमेच्या ३५% अग्रीम रक्कम/फिरता निधी (रिव्हाल्वींग फंड)म्हणून सुलभ इंटरनॅशनल सोशल सर्व्हीस ऑर्गनायझेशन, मुंबई संस्थेस देण्यात येईल आणि या अग्रिमाचे समायोजन शेवटच्या बिलामधुन करण्यात येईल. यासाठी नियमाप्रमाणे विहीत शुल्काच्या मुद्रांकावर हमीपत्र (Undertaking) लिहून देणे संस्थेस बंधनकारक राहील. बांधकाम सुरू करणेपुर्वी संस्थेबरोबर विहीत करारनामा करण्यात येईल.

१०. सुलभ सुविधा केंद्राच्या उभारणीपोटी संस्थेस बिलाची रक्कम अदा करणेसाठी खालील प्रमाणे टप्पे ठरविण्यात येतील.

| | | |
|---|---|---|
| अ) | अग्रीम रक्कम/ फिरता निधी | ३५% |
| ब) | जोत्याचे बांधकाम पुर्ण झाल्यावर | १५% |
| क) | लिंटल लेव्हल पर्यंतचे काम पुर्ण झाल्यावर | १५% |
| ड) | छताचे बांधकाम पुर्ण झाल्यानंतर | २०% |
| इ) | सुविधा केंद्राचे उद्‌घाटन समारंभानंतर | १५% |
| | **एकुण :-** | **१००%** |

पहिल्या टप्प्यात खालील नमुद २० ठिकाणी सुलभ सुविधा केंद्राची उभारणी करणे प्रस्तावित आहे.

| अ.क्र. | ठिकाण | बैठकांची संस्था | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | टि.व्ही.सेंटर चौक | १२ | १४,३१,०००/- |
| २ | सार्वजनिक बांधकाम कार्यालयाजवळ,पदमपुरा | १२ | १४,३१,०००/- |
| ३ | सेव्हनहिल उड्डाणपुलाच्या खाली | १२ | १४,३१,०००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | अशोकनगर शहाबाजार | १२ | १४,३१,०००/- |
| ५ | मध्यवर्ती जकात नाका, बायजीपुरा | १२ | १४,३१,०००/- |
| ६ | वार्ड कार्यालय-ड परिसर, क्रांतीचौक | १२ | १४,३१,०००/- |
| ७ | जाफरगेट मिडलस्कुल, गांधीनगर | १२ | १४,३१,०००/- |
| ८ | गजानन महाराज मंदीर चौक | १२ | १४,३१,०००/- |
| ९ | औरंगाबाद रेल्वे स्टेशन | ०७ | ११,४७,०००/- |
| १० | मुकूंदवाडी पोलीस स्टेशन जवळ | ०७ | ११,४७,०००/- |
| ११ | आंबेडकर चौक एन-७ सिडको | ०७ | ११,४७,०००/- |
| १२ | जिल्हा सत्र न्यायालय परिसर | ०७ | ११,४७,०००/- |
| १३ | पैठणगेट वाहनतळ | ०७ | ११,४७,०००/- |
| १४ | आर.टी.ओ. कार्यालयाजवळ | ०७ | ११,४७,०००/- |
| १५ | निराला बाजार नाल्याजवळ,औरंगपुरा | ०७ | १६,३६,०००/- |
| १६ | मिल कॉर्नर रोड नाला,नागेश्वरवाडी | १० | १६,३६,०००/- |
| १७ | बारूदगरनाला जवळ, औरंगपुरा | १० | १६,३६,०००/- |
| १८ | प्रतापनगर नाला चौरसनगर | १० | १६,३६,०००/- |
| १९ | घाटी हॉस्पीटल मकईगेट नाला | १० | १६,३६,०००/- |
| २० | नवजीवन कॉलनी भाजी मंडई | १० | १६,३६,०००/- |
| | | | **एकुण २,७२,६६,०००/-** |

उपरोक्त नमुद केल्यानुसार सुलभ सुविधा केंद्राच्या उभारणीस अंदाजे एकुण रूपये २,७२,६६,०००/- इतका खर्च अपेक्षीत आहे. सदर खर्चास सन २००७-०८ चे अर्थसंकल्पात तरतुद उपलब्ध होणे आवश्यक आहे.

तरी वरील प्रमाणे सुलभ सुविधासह (मुतारी,शौचालय व स्नानगृह संकुल) उभारणी करणे व **पैसे द्या व वापरा** या तत्वावर सुलभ इंटरनॅशनल सोशल सर्व्हीस ऑर्गनायझेशन, मुंबई या संस्थेस वरील अटी व शर्तीच्या तहत चालविण्यास देणे व यासाठी आवश्यक रक्कम रूपये २,७२,६६,०००/- ची तरतुद सन २००७-०८ च्या अर्थसंकल्पात करणे आणि सदर अंदाजपत्रक रक्कम रूपये २,७२,६६,०००/- ला मान्यता मिळणेस्तव प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहरात विविध ठिकाणी सुलभ सुविधागृह (मुतारी,शौचालय व स्नानगृह संकुल) उभारणेस व पैसे द्या व वापरा या तत्वावर सुलभ इंटरनॅशनल सोशल सर्विस ऑर्गनायझेशन,मुंबई या संस्थेस प्रस्तावात नमुद अटी व शर्तीवर चालविण्यास देणेस तसेच पहिल्या टप्प्यात प्रस्तावात नमुद विविध २० ठिकाणी सुलभ सूविधा केंद्राची उभारणी करणे आणि या कामास अंदाजपत्रकीय र.रू.२,७२,६६,०००/- यास मंजुरी देण्यात येवून सन २००७ - ०८ च्या अर्थसंकल्पात सदरील तरतूद ठेवण्यासही मान्यता देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७६५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या शासन मंजुर विकास नियंत्रण नियमावलीत शासनाची अधिसुचना क्रमांक टीपीएस-३००२/७५३/सी आर-१६६/२००२/युडी-३० दिनांक ०८ जानेवारी २००७ नुसार विकास हक्क हस्तांतरण (टीडीआर) नियम लागू झाला आहे. टीडीआर

कोणत्या भागात व कोणत्या वेळी देय करायचा हा नियोजन प्राधिकरण म्हणुन महानगरपालिकेचा विषय आहे. वेगवेगळ्या नियोजन घटकांचा विचार करतांना त्या भागातील नागरीक सुविधांवर पडणारा ताण, रहदारी,गर्दी परिसराचा विकास नियोजीत व अस्तित्वातील रस्त्यांचा विकास या सर्व बाबी विचारात घेणे आवश्यक आहे. याकरीता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे ३१ नुसार विकास हक्क हस्तांतरणाची प्रकरणे हाताळण्यासाठी एका तदर्थ समितीची अॅडहॉक कमिटी नेमणूक करण्यात यावी. या तदर्थ समितीत पाच पदाधिकारी असावेत व या सदस्यांची नावानिशी नेमणूक करण्याचे अधिकार मा.महापौर यांना देण्यात यावेत. सदरील समिती ५०० चौ.मी.पेक्षा जास्त भुखंड क्षेत्रावर टीडीआर देण्याबाबत अभिप्राय देईल व त्यानंतरच नगररचना विभागाकडून टीडीआर देण्याची कार्यवाही करण्यात येईल. समितीच्या कामकाजाचे स्वरूप व नियमावली सहाय्यक संचालक नगररचना म.न.पा. यांच्या सहकार्याने मा.महापौर निश्चित करतील. करीता उक्त अधिनियमाच्या कलम ३१ नुसार तदर्थ समिती स्थापना करण्याकरीता मान्यता व्हावी. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : सौ.लता दलाल अनुमोदक : श्री.संतोष खेंडके, श्री.सतिष कटकटे, श्री.रविकांत गवळी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेच्या शासन मंजुर विकास नियंत्रण नियमावलीत शासनाची अधिसुचना क्रमांक टीपीएस-३००२/७५३/सी आर-१६६/२००२/युडी-३० दिनांक ०८ जानेवारी २००७ नुसार विकास हक्क हस्तांतरण (टीडीआर) नियम लागू झाला आहे. त्या संदर्भात टीडीआर कोणत्या भागात व कोणत्या वेळी देय करायचा हा नियोजन प्राधिकरण म्हणुन महानगरपालिकेचा विषय असल्यामूळे,वेगवेगळ्या नियोजन घटकांचा विचार करतांना त्या भागातील नागरीक सुविधांवर पडणारा ताण, रहदारी, गर्दी परिसराचा विकास नियोजीत व अस्तित्वातील रस्त्यांचा विकास या सर्व बाबी विचारात घेणेसाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे ३१ नुसार विकास हक्क हस्तांतरणाची प्रकरणे हाताळण्यासाठी एका तदर्थ समितीची अॅडहॉक कमिटी नेमणूक करण्यास व या तदर्थ समितीत पाच पदाधिकारी असावे,या सदस्यांची नावानिशी नेमणूक करण्याचे अधिकार मा.महापौर यांना देण्यास आणि सदरील समिती ५०० चौ.मी.पेक्षा जास्त भुखंड क्षेत्रावर टीडीआर देण्याबाबत अभिप्राय देईल व त्यानंतरच नगररचना विभागाकडून टीडीआर देण्याची कार्यवाही करण्यास तसेच समितीच्या कामकाजाचे स्वरूप व नियमावली सहाय्यक संचालक नगररचना महानगरपालिका यांच्या सहकार्याने मा.महापौर निश्चित करतील. करीता उक्त अधिनियमाच्या कलम ३१ नुसार तदर्थ समितीची स्थापना करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७६६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, कबीर नगर वार्डातील नागसेन नगर,मिलींद नगर, मुरलीधर नगर, कबीर नगर या वार्डातील वसाहती आणि हा वार्ड स्लम घोषीत वार्ड आहे. त्याच बरोबर हा वार्ड अनुसूचित जातीसाठी महानगरपालिका अस्तित्वात आल्यापासुन राखीव वार्ड आहे. या वार्डामध्ये १०० टक्के अनुसूचित जाती जमातीचे लोक राहतात. आणि दारिद्र रेषेखाली जीवन जगतात या भागाचा काहीच विकास झालेला नाही. कुठलेही काम झालेले नाही. करीता केंद्र आणि राज्य शासनाकडून दलीत वस्ती सुधार योजने अंतर्गत वार्डातील मुलभूत सुविधा अंतर्गत या वार्डातील लोकांना पिण्याच्या पाण्यासाठी पाण्याची टाकी बांधणे, वसाहती अंतर्गत ड्रेनेज लाईन टाकणे यासाठी र.रू.८०,००,०००/-चा प्रस्ताव मंजुर करून जिल्हाधिकारी कार्यालयातील नगरपालिका प्रशासनास पाठविण्यात यावा.

सुचक : श्री.के.व्ही.मोरे, श्री.मधुकर सावंत अनुमोदक : श्री.हिम्मतराव दाभाडे

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, कबीरनगर वार्डातील नागसेन नगर,मिलींद नगर, मुरलीधर नगर, कबीर नगर या वार्डातील वसाहतीत, केंद्र आणि राज्य शासनाकडून दलीत वस्ती सुधार योजने अंतर्गत वार्डातील लोकांना पिण्याच्या पाण्यासाठी पाण्याची टाकी बांधणे, वसाहती अंतर्गत ड्रेनेज लाईन टाकणेसाठी र.रू.८०,००,०००/- च्या खर्चास मंजुरी देण्यांत येवून,जिल्हाधिकारी कार्यालयातील नगरपालिका प्रशासनास पाठविण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. ७६७ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड नं ३५ मधील गरम पाणी ते छावणी या भागास जोडणारा पुल हा अगदी कमी उंची व रूंदीचा असल्यामुळे पावसाळ्याचे पाणी त्यावरून वाहते याच पावसाळ्यात ०२ मुले नदीच्या पाण्यात वाहुन गेलेले होते. सदरील पुल जमिनीच्या पातळीपासुन खाली असल्यामुळे त्याची रूंदी व उंची वाढविणे अत्यंत गरजेचे आहे. व पुल जुना असल्यामुळे कमजोर झालेला आहे. या पुलाचा उपयोग संपुर्ण शहरास होतो.

सदरील पुलावरून रहदारी तथा वाहतुकीची फार वर्दळ असते सदर पुल स्लम भागात येतो. पुलाचे काम करण्याकरीता मनपा अर्थसंकल्प २००७-०८ मध्ये शासनाकडून वित्त आयोग किंवा स्लम भागासाठी येणारे अनुदानातुन या पुलासाठी ३५ ते ४० लाख रूपये ची तरतुद ठेवण्याचा प्रस्ताव सर्व साधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.अ.रशीद खान (मामू)

अनुमोदक : श्री.अ.साजेद अ.सत्तार, श्री.प्रशांत देसरडा,सौ.लता दलाल, श्री.संतोष खेंडके पाटील.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड नं ३५ मधील गरम पाणी ते छावणी या भागास जोडणारा पुलाची रूंदी व उंची वाढविणेसाठी महानगरपालिका अर्थसंकल्प २००७-०८ मध्ये शासनाकडून वित्त आयोग किंवा स्लम भागासाठी येणारे अनुदानातुन या पुलासाठी र.रू.३५ ते ४० लाखाची तरतुद ठेवण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. ७६८ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,शहानगर,मसनतपुर या भागात ९०% दलित नागरीक रहात असुन या भागातील नागरी सुविधा जसे, जलवाहिनी, जलनि:सारण वाहिनी, अंतर्गत कॉंक्रेटचे रस्ते, उघड्या गटारी, आदी आवश्यक कामे करण्यासाठी अंदाजे ६० लाख रूपयांची आवश्यकता आहे. करीता सदर खर्च दलित वस्ती सुधार शासन योजनेमार्फत करणे करीताचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर तसेच सदरील कामाकरीता उपरोक्त प्रमाणे आवश्यक निधीची (६० लक्ष) तरतुद करण्याकरीता प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचेकडे पाठविणे करीता मा.सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

सुचक : श्रीमती मीराताई शिंदे अनुमोदक : सौ.विजया रहाटकर, श्री.भगवान घडमोडे

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहानगर,मसनतपुर या भागात ९०% दलित भागातील नागरी सुविधा जसे,जलवाहिनी,जलनि:सारण वाहिनी,अंतर्गत कॉंक्रेटचे रस्ते,उघड्या गटारी,आदी आवश्यक कामे करण्यासाठी अंदाजे र.रू.६०.०० लाखास मंजुरी देण्यांत येवून, सदर खर्च दलित वस्ती सुधार योजनेमार्फत करणेस आणि सदरील कामाकरीता आवश्यक निधी र.रू.६०.०० लक्षची तरतुद

करण्याकरीता प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचेकडे पाठविणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७६९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.२४ नारेगांव या भागात १००% दलित नागरीक रहात असुन या भागातील नागरी सुविधा जसे,नविन जलवाहिनी, नविन जलनि:सारण वाहिनी, कॉंक्रेटचे रस्ते, डांबरीकरण, गटारी, आदी आवश्यक कामे करण्यासाठी अंदाजे ३० लाख रूपयांची आवश्यकता आहे. करीता सदर खर्च दलित वस्ती सुधार शासन योजनेमार्फत करणेस करीताचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर तसेच सदरील उपरोक्त प्रमाणे आवश्यक निधीची (३० लाख) तरतुद करण्याकरीता प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचेकडे पाठविणे करीता मा.सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

सुचक : सौ.दिपाली पाटील अनुमोदक : श्री.सितारात सुरे, श्री.महेश माळवतकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.२४ नारेगांव या भागात १००% दलित नागरीक रहात असुन या भागातील नागरी सुविधा जसे,नविन जलवाहिनी, नविन जलनि:सारण वाहिनी, कॉंक्रेटचे रस्ते, डांबरीकरण, गटारी, आदी आवश्यक कामे करण्यासाठी अंदाजे र.रू.३०.०० लाखास मंजुरी देण्यांत येवून सदर खर्च दलित वस्ती सुधार योजनेमार्फत करणेस आणि सदरील कामाकरीता आवश्यक निधी र.रू.३०.०० लक्षची तरतुद करण्याकरीता प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचेकडे पाठविणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७७० :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.१ फुलेनगर, हर्सुल या भागात ९०% दलित नागरीक रहात असुन या भागातील नागरी सुविधा जसे,जलवाहिनी, जलनि:सारण वाहिनी, अंतर्गत कॉंक्रेटचे रस्ते,उघड्या गटारी, आदी आवश्यक कामे करण्यासाठी अंदाजे ५० लाख रूपयांची आवश्यकता आहे. करीता सदर खर्च दलीत वस्ती सुधार शासन योजनेमार्फत करणे करीताचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर तसेच सदरील कामाकरीता उपरोक्त प्रमाणे आवश्यक निधीची (५० लाख) तरतुद करण्याकरीता प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी,औरंगाबाद यांचेकडे पाठविणे करीता मा.सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

सुचक : श्री.पुनमचंद बमणे अनुमोदक : श्रीमती डॉ.आशा बिनवडे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.१ फुलेनगर, हर्सुल या भागात ९०% दलित नागरीक रहात असुन या भागातील नागरी सुविधा जसे,जलवाहिनी, जलनि:सारण वाहिनी, अंतर्गत कॉंक्रेटचे रस्ते,उघड्या गटारी, आदी आवश्यक कामे करण्यासाठी अंदाजे र.रू.५०.०० लाखास मंजुरी देण्यांत येवून सदर खर्च दलीत वस्ती सुधार योजनेमार्फत करणेस आणि सदरील कामाकरीता आवश्यक निधी र.रू.५०.०० लक्षची तरतुद करण्याकरीता प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचेकडे पाठविणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७७१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.७१ मध्ये ५५ टक्के अनुसुचित जाती जमातीचे नागरीक असुन दलित समाज व दारिद्रय रेषेखालील कुटुंब या वार्डामध्ये मोठ्या प्रमाणात आहे. परंतु अद्याप पर्यंत या भागाचा विकास झालेला नाही. केंद्र सरकार व महाराष्ट्र सरकार मार्फत जे दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत अनुदान येते की, त्यामधुन खालील विकास कामाचे करण्यासाठी २५ लक्ष पर्यंत तरतुद करण्यात यावी.

१. नविन ड्रेनेज लाईन
२. जलवाहिणी टाकणे
३. रस्त्याचे डांबरीकरण, खडीकरण, पेव्हर ब्लॉक बसविणे.
४. नाला,सांडपाण्याचा निचरा करण्यासाठी व्यवस्था करणे.

उक्त विकास कामासाठी सन २००७-२००८ च्या अर्थसंकल्पात २५ लक्ष तरतुद ठेवण्यात यावी करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.संतोष खेंडके पाटील          अनुमोदक : श्री.सतिष कटकटे, श्री.विजय खुडे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.७१ मध्ये ५५ टक्के अनुसुचित जाती जमातीचे नागरीक असुन या वार्डामध्ये नविन ड्रेनेज लाईन,जलवाहिणी टाकणे,रस्त्याचे डांबरीकरण,खडीकरण,पेव्हर ब्लॉक बसविणेकरीता केंद्र शासन व राज्य शासनामार्फत दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत अनुदान येते त्यामधुन विकास कामे करण्यासाठी र.रू.२५.०० लक्ष तरतुद अर्थसंकल्प २००७-२००८ मध्ये ठेवण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७७२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मी माझ्या वार्ड करीता दिनांक २०.११.२००६ रोजी संपन्न झालेल्या सर्व साधारण सभेमध्ये विषय क्र.५८३/३ वर अर्थसंकल्प पुस्तिकामध्ये पान क्र. डब्ल्यु १७८ चा प्रस्ताव २.०० लक्ष गटारीचे हेड बदलण्या करीता दिला होता परंतु अर्थसंकल्प पुस्तिकामध्ये डब्ल्यु १७८ ऐवजी डब्ल्यु-१२८ झालेला आहे कृपया दुरूस्त करून पान क्र.डब्ल्यु-१७८ करण्यात यावा.

सुचक : श्रीमती खान मेहेरून्नीसा हमीद खान

अनुमोदक : श्री.अ.साजेद अ.सत्तार, श्री.अ.रशिद खान (मामु)

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, दिनांक २०.११.२००६ रोजी संपन्न झालेल्या सर्व साधारण सभेमध्ये विषय क्र.५८३/३ वर अर्थसंकल्प पुस्तिकामध्ये पान क्र. डब्ल्यु १२८ **ऐवजी** पान क्र. डब्ल्यु -१७८ समजणे या दुरूस्तीस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७७३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.८९ ज्योतीनगर,चौसरनगर या भागात ९०% दलित नागरीक रहात असुन या भागातील नागरी सुविधा जसे, नविन जलवाहिनी ,नविन जलनि:सारण वाहिनी,काँक्रेटचे रस्ते,डांबरीकरण,गटारी,आदी आवश्यक कामे करण्यासाठी अंदाजे २० लाख रूपयांची आवश्यकता आहे.करीता सदर खर्च दलित वस्ती सुधार शासन योजनेमार्फत करणे करीताचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर तसेच सदरील कामाकरीता उपरोक्त प्रमाणे आवश्यक निधीची (२० लक्ष) तरतुद करण्याकरीता प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी,औरंगाबाद यांचेकडे पाठविणे करीता मा.सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

सुचक : सौ.विजया रहाटकर

अनुमोदक : श्रीमती जयश्री किवळेकर, सौ.सरला पोळ,श्रीमती मिराताई शिंदे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.८९ ज्योतीनगर,चौसरनगर या भागात ९०% दलित नागरीक रहात असुन या भागातील नागरी सुविधा जसे, नविन जलवाहिनी ,नविन जलनि:सारण वाहिनी,काँक्रेटचे

रस्ते,डांबरीकरण,गटारी,आदी आवश्यक कामे करण्यासाठी अंदाजे र.रू.२०.००लाखास मंजुरी देण्यांत येवून सदर खर्च दलित वस्ती सुधार योजनेमार्फत करणे करीता व आवश्यक निधी र.रू.२०.०० लक्ष तरतुद करण्याकरीता प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी,औरंगाबाद यांचेकडे पाठविणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७७४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.३८ गांधीनगर दलितवस्ती असुन स्लम वार्ड आहे. या वार्डामध्ये आतापर्यंत दलीत वस्ती सुधार योजने अंतर्गत काही विकास काम करण्यात आलेले नाही. करीता मा.महापौर साहेबांनी सर्वसाधारण सभेमध्ये दलीत वस्ती सुधार बजेट मधुन एक करोड रूपये गांधीनगर वार्डात विविध विकास कामाकरीता ठेवण्यात यावे. करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

सुचक : श्री.संजु सुग्रीव रिडलॉन

अनुमोदक :श्री.सिताराम सुरे,श्री.महेश माळवतकर,सौ.दिपाली पाटील सौ.सरला पोळ, सौ.अंजली कोंडेकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.३८ गांधीनगर दलितवस्ती वॉर्डासाठी दलीत वस्ती सुधार योजने अंतर्गत विकास कामासाठी र.रू.१.०० कोटी गांधीनगर वॉर्डासाठी ठेवण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७७५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड नं९६ येथे दत्त सोप फॅक्टरीच्या पाठीमागे मनपाने पुर्वी विकसीत केलेली जुनी हिन्दु स्मशानभूमी आहे. परंतु सध्या तेथे फार दयनिय अवस्था झालेली आहे सदर ठिकाणी काम करण्यास मनपाने सन २००५-०६ व २००६-०७ च्या बजट मध्ये ०५ लाखाची आर्थिक तरतुद करण्यात आलेली होती. परंतु विधी सल्लागार सदरील संचिका निकाली काढत नसल्याने येथील लोकांना नातेवाईकाचे अंत्यविधी दयनिय स्मशानभूमीत करावे लागत आहे. येथील रस्ता पावसाळ्याचे पाण्याने वाहुन गेलेला आहे. शेड तुटलेला आहे, भिंती पडलेल्या आहे,विद्युत व्यवस्था नाही. तसेच स्मशान जोगी साठी रूम नसल्याने रूम बांधणे इत्यादी कामे करणे अत्यंत गरजेचे आहे.

करीता विधी सल्लागाराचे सभागृहात खुलासा करून सदरील कामे करण्यास मनपा अर्थसंकल्प २००७-२००८ मध्ये रक्कम रूपये १० लाखाची आर्थिक तरतुद करण्याकरीता प्रस्ताव सर्व साधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्रीमती मोमीन सफिया फिरदौस अय्युब खान

अनुमोदक : श्री.वसंत नरवडे पाटील,श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्रं.९६ येथे दत्त सोप फॅक्टरीच्या पाठीमागे असलेल्या हिन्दु स्मशानभूमीच्या विकासासाठी र.रू.१०.०० लाखाची आर्थिक तरतूद अर्थसंकल्प सन २००७-२००८ मध्ये करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७७६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, कैलासनगर वार्ड क्रमांक- ५८ ह्या वार्डातील लोकसंख्येपैकी ५०% पेक्षा जास्त लोकसंख्या ही मागासवर्गीय दलित समाज व दारिद्रय रेषेखालील कुटुंब या वार्डात मोठ्या प्रमाणात आहेत. या भागाचा विकास झालेला नाही. दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत या वसाहतीत कुठेही

काम झालेले नाही. केंद्र सरकार व महाराष्ट्र सरकार मार्फत जे दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत जो पैसा येतो तो पैसा या वार्डामध्ये खर्च करण्यात यावा व मुलभूत सुविधा देण्यात याव्यात.

०१. नवीन ड्रेनेज लाईन टाकणे

०२. नवीन जलवाहिनी टाकणे

०३. रस्ते डांबरीकरण करणे,खडीकरण करणे,पेव्हींग ब्लॉक बसविणे

०४. नाल्या,सांडपपाणी जाण्याकरीता व्यवस्था करणे.

हो सर्व कामे करण्याकरीता कैलासनगर या वस्तीमध्ये काम करण्याकरीता रक्कम रूपये ०१ कोटी सन २००७-०८ च्या अर्थसंकल्पात ठेवण्यात यावा.

करीता सर्वानुमते सदर प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : सौ.सरला सखाराम पोळ अनुमोदक : श्री.भगवान घडमोडे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, कैलासनगर वार्ड क्रमांक- ५८ ह्या वार्डातील लोकसंख्येपैकी ५०% पेक्षा जास्त लोकसंख्या ही मागासवर्गीय दलित समाज व दारिद्रय रेषेखालील कुटुंब मोठ्या प्रमाणात असल्यामूळे, केंद्र शासन व राज्य शासनाच्या दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत या वसाहतीत नवीन ड्रेनेज लाईन टाकणे,नवीन जलवाहिनी टाकणे, रस्ते डांबरीकरण करणे,खडीकरण करणे,पेव्हींग ब्लॉक बसविणे,नाल्या,सांडपाणी जाण्याकरीता व्यवस्था करणे या कामासाठी वॉर्ड क्र.५८ कैलासनगर करीता रक्कम रूपये १.०० कोटी सन २००७-०८ च्या अर्थसंकल्पात ठेवण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७७७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, गांधीनगर वार्डात समाजमंदीर बांधणे या कामाची तरतुद २००६-०७ च्या अर्थसंकल्पामध्ये लेखाशिर्षात बदल करून ठेवण्यात आली होती. परंतु या कामाची सध्या वार्डात गरज नसल्याने सदरील कामाची तरतुद वर्ग करून ''वार्डात हॅंड पंप लावणे''या कामासाठी लेखाशिर्षात बदल करण्यात यावा. सदरील कामासाठी रक्कम रूपये ०५ लाख वळती करण्यात यावीत.

करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.संजु रिडलॉन अनुमोदक : श्री.भगवान घडमोडे, श्रीमती अल्पा जैन

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, गांधीनगर वार्डात समाजमंदीर बांधणे या कामासाठी असलेली तरतुद **याऐवजी** वार्डात हॅंड पंप लावणे या कामासाठी र.रू.५.०० लक्ष वळती करून लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७७८ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, स.नं.११७/१ पैकी व स.नं.१ नक्षत्रवाडी येथे सौ.गयाबाई जगन्नाथ मुठेकर व अनिता चंद्रकांत लगड नांवे रेखाकंन पुर्वी सहाय्यक संचालक,नगर रचना औरंगाबाद कार्यालयाकडून तत्वत: मंजुर करण्यात आले होते.

सदर रेखाकंनातील अंतर्गत रस्ते व खुली जागा इत्यादी बाबत संबंधीत मिळकत धारकास पुरेसे ज्ञान नसल्याने, तत्वत: मंजुरी प्रमाणे रस्ते, खुली जागा महानगरपालिकेत हस्तांतरीत झाले आहेत.

वास्तविक सदर रेखाकंन सुधारित विकास योजना लागू झाल्याने, तद्अनुषंगाने रेखाकंन सुधारित करून त्यास महानगरपालिकेची रितसर मान्यता आवश्यक आहे.

करीता रेखाकंन प्रस्ताव सुधारित करणेस व त्या अनुषंगाने अंतर्गत रस्ते, खुली जागा व विकास योजना रस्ते इत्यादी बाबत दुरूस्ती परिमोचन पत्र (Correct Reliquisment Deal) करणे इत्यादी प्रक्रिया पूर्ण करून घेणे बाबत मान्यता देण्यात यावी. सहाय्यक संचालक नगर रचना महानगरपालिका औरंगाबाद यांना नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्याचे आदेश देणेस्तव व प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

सुचक : श्री.प्रशांत देसरडा अनुमोदक : श्री.अब्दुल रशिद खान मामु

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, स.नं.११७/१ पैकी व स.नं.१ नक्षत्रवाडी रेखाकंन सुधारित करणेस व त्या अनुषंगाने अंतर्गत रस्ते, खुली जागा व विकास योजना रस्ते इत्यादी बाबत दुरूस्ती परिमोचन पत्र (Correct Reliquisment Deal) करणेस मान्यता देण्यात येवून, सहाय्यक संचालक नगर रचना महानगरपालिका औरंगाबाद यांनी नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

राष्ट्रगितानंतर सायं.६.०० वाजता सभेचे कामकाज संपन्न झाल्याचे मा.महापौर यांनी घोषीत केले.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद